**प्रकल्प प्रवर्तक मे. विराज प्रोफाईल्स प्रा. लि., यांच्या सर्व्हे क्रमांक २४/अ, २४/ब, २५/१, २५/२, २६ ते २९, ३१, ३३, ३४, ४६, ५५, ५८, ६०, गाव-मान आणि सर्व्हे क्रमांक ४४, ४९, ५०, ५१, ५५, ५६, ५७/१, ५७/२, ५८, गाव- वारांगडे, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील कार्यरत हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन क्षमतेचा प्रकल्प १,९५,८४० टीपीए पासून २२,७६,००० टीपीए पर्यंत (२,७६,००० टीपीए हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन आणि २०,००,००० टीपीए एचआरएपी / सीआरएपी शिट्स, प्लेट्स आणि कॉईल) पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. विराज प्रोफाईल्स प्रा.लि., यांच्या सर्व्हे क्रमांक २४/अ, २४/ब, २५/१, २५/२, २६ ते २९, ३१, ३३, ३४, ४६, ५५, ५८, ६०, गाव-मान आणि सर्व्हे क्रमांक ४४, ४९, ५०, ५१, ५५, ५६, ५७/१, ५७/२, ५८, गाव- वारांगडे, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील कार्यरत हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन क्षमतेचा प्रकल्प १,९५,८४० टीपीए पासून २२,७६,००० टीपीए पर्यत (२,७६,००० टीपीए हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन आणि २०,००,००० टीपीए एचआरएपी / सीआरएपी शिट्स, प्लेट्स आणि कॉईल) पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रकल्प स्थळ - मे. विराज प्रोफाईल्स प्रा.लि. (एसआरएम युनिट), हत्ती गेटजवळ, गट नं. २७, मान गाव, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे दिनांक ०८-०४-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

श्री विरेन्द्र सिंह, उपप्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, तालुका, जिल्हा-पालघर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुभाष भागडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री किरण हसबनीस, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर आणि उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा-पालघर - ४०१ ५०४ यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की **प्रकल्प प्रवर्तक मे. विराज प्रोफाईल्स प्रा.लि., तालुका, जिल्हा-पालघर** यांचा त्यांच्या सर्व्हे क्रमांक २४/अ, २४/ब, २५/१, २५/२, २६ ते २९, ३१, ३३, ३४, ४६, ५५, ५८, ६०, गाव-मान आणि सर्व्हे क्रमांक ४४, ४९, ५०, ५१, ५५, ५६, ५७/१, ५७/२, ५८, गाव- वारांगडे, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील कार्यरत हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन क्षमतेचा प्रकल्प १,९५,८४० टीपीए पासून २२,७६,००० टीपीए (२, ७६,००० टीपीए हॉट रोल्ड स्टेनलेस स्टील उत्पादन आणि २०,००,००० टीपीए एचआरएपी / सीआरएपी शिट्स, प्लेट्स आणि कॉईल) पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १२.०२.२०२६ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार जरी श्रेणी ब-१ - अनुसूची क्र. ३ (अ) दुय्यम धातुप्रक्रिया उद्योगा ( Secondary metallurgical processing industry) मध्ये मोडला गेला असून अत्यंत प्रदूषित क्षेत्राच्या (MIDC Tarapur) सिमेपासून १० कि.मी पर्यंत येत असल्याने सदरहू प्रकल्प श्रेणी अ मध्ये वर्ग मध्ये मोडतो. त्यानुसार प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन

अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २६.०७.२०२५ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १८.०९.२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ जानेवारी, २०२५ ते ३१ मार्च, २०२५ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/ आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम),तालुका,जिल्हा-पालघर - ४०१ ५०४ यांनी पत्र दिनांक १६.०२.२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बुधवार दिनांक ०८-०४-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ § मे. विराज प्रोफाईल्स प्रा.लि. (एसआरएम युनिट), हत्ती गेटजवळ, गट नं. २७, मान गाव, तालुका, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-१४/ २०२६ व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२६०३१२ एफटीएस-००३३, दिनांक १२.०३.२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी -
प्रादेशिक अधिकारी - ठाणे,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे

३) उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
बोईसर (पश्चिम),
तालुका, जिल्हा-पालघर

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा-पालघर-४०१ ५०४, महाराष्ट्र यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल यात इंग्रजीत दिनांक ०६ मार्च, २०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीची सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती.

तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

| | |
|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी, पालघर, तालुका,जिल्हा-पालघर |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,पालघर |
| ३) | उप-विभागीय अधिकारी,पालघर,जिल्हा-पालघर |
| ४) | प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ |
| ५) | संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |
| ६) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा-पालघर |

| | |
|---|---|
| ७) | सहसंचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन पूर्व, मुंबई - ४०० ०२२ |
| ८) | प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,ठाणे |
| ९) | उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका,जिल्हा-पालघर - ४०१ ५०४ |
| १०) | तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका,जिल्हा-पालघर |
| ११) | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका, जिल्हा-पालघर, |
| १२) | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत- मान, वारांगडे, महागाव, गुंदले, बेटेगांव, खैरापाडा, |
| १३) | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत- मान-वारागंडे, महागाव-गुंदले, |
| १४) | संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई- मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे. |

आजतागायत (काल दिनांक ०७-०४-२०२६ रोजी पर्यत) उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२ यांना **३५७** सूचना/ आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून प्रत्यक्ष/ पोस्टाने/ ई-मेलद्वारे प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही फक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/ आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/ आक्षेप, बैठकीचे



VH

इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण करण्यास सुरुवात केली.

त्यावेळी उपस्थितांमधील काही लोक व महिला हे प्रस्तावित प्रकल्पास मान्यता देऊ नये याबाबत एकत्रित घोषणा करत होते. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना शांततेने बसण्याची सूचना केली. अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले की सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आपण आपल्या सूचना, हरकती, आक्षेप नोंदवू शकता. मात्र उपस्थित बहुसंख्येने एकत्रितपणे प्रकल्प विस्तारिकरण रद्द करण्याच्या घोषणा देत होते.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (ईएमपी) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी आयोजित करण्यापूर्वी प्राथमिक मान्यता (ToR) हा दिनांक १८-०९-२०२५ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार जरी श्रेणी ब-१ - अनुसूची क्र. ३ (अ) दुय्यम धातुप्रक्रिया उद्योगा ( Secondary metallurgical processing industry) मध्ये मोडला गेला असून अत्यंत प्रदूषित क्षेत्राच्या (MIDC Tarapur) सिमेपासून १० कि.मी पर्यंत येत असल्याने सदरहू प्रकल्प श्रेणी अ मध्ये वर्ग मध्ये मोडतो. त्यानुसार प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित विस्तारिकरण मनुष्यबळाची आवश्यकता असून प्रकल्पात कायमस्वरुपी ७०० व्यक्ती काम करत असून विस्तारिकरणानंतर २००० व्यक्तींची आवश्कता लागणार आहे, तर अस्थायी रोजगाराची संधि सध्या १,१०० व्यक्तीना मिळते, त्याठिकाणी, ३,००० व्यक्तींना संधि मिळणार आहे.

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पातून १,८१२ केएलडी सांडपाणी निर्माण होणार असून त्यावर प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेत प्रक्रिया केल्यानंतर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात उत्पन्न होणा-या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. अशा रितीने प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज - शून्य द्रव निःसारण प्रकल्प असेल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी संपुर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी माहिती दिली.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण केलेले आहे. तर या सादरीकरणाच्या अनुषंगाने आपणास प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे. आपण आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. आपणास विनंती आहे की जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे, तो परत उपस्थित करण्यात येऊ नये, जेणेकरुन सर्वांना त्यांच्या सूचना/ आक्षेप नोंदविण्यास संधि देता येईल. तसेच आपसात चर्चा न करता आपल्या सूचना/आक्षेप/हरकती मुद्देसुद मांडण्यात याव्यात. त्यांची नोंद घेण्यात येणार आहे.

त्यावेळी काही पुरुष व महिला एकत्रितपणे प्रकल्पविरोधात घोषणा देत होते व प्रकल्पाची जनसुनावणी ही रद्द करण्याची एकत्रित मागणी करत होते.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**



VH

१) श्री मोरेश्वर बाळा दौडा, माजी सरपंच, मान ग्रामपंचायत,तालुका,जिल्हा-पालघरः-

आज दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, बोईसर (प), तालुका व जिल्हा-पालघर यांनी मे. विराज प्रोफाईल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या विस्तारिकरणाबाबत आयोजित केलेली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही "पेसा" कायद्यांतर्गत येणा-या ग्रामसभेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी असल्याने ती बेकायदेशीर असून ती रद्द करावी या संदर्भात ग्रामपंचायत, **मान**, तालुका,जिल्हा-पालघर यांनी दिनांक २४-०३-२०२६ रोजी ग्रामसभा बोलविलेली होती. प्रकल्प प्रवर्तक मे. विराज प्रोफाईल्स प्रा. लि. यांना विस्तारिकरणास मान्यता देण्यात येऊ नये असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला आहे. जर ग्रामसभेनेच प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास मान्यता दिलेली नसल्याने प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे हेच मुळात अवैध (illegal) आहे. त्यामुळे ही जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हरकतीची नोंद घेण्यात आलेली आहे.

२) एडव्होकेट हेमंत परशुराम पाटील, राहणार- मान ग्रामपंचायत हद्दीत, तालुका, जिल्हा-पालघरः-

आपणास निवेदन करण्यात येते की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०४-०३-२०२६ रोजी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची सूचना प्रसिध्द केलेली आहे. ती **मान** ग्रामपंचायत कार्यालयात १३-०३-२०२६ रोजी प्राप्त झालेली आहे. ती सूचना सर्व ग्रामपंचायत कार्यालयात तीस दिवस अगोदर प्राप्त होणे बंधनकारक असतानाही ती **मान** ग्रामपंचायत कार्यालयात उशिरा प्राप्त झालेली. आहे. म.प्र.नि.मंडळाकडून ती चूक झालेली असून बेकायदेशीरपणे आज दिनांक ०८-०४-२०२६ रोजी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली आहे.

तसेच नियमानूसार प्रकल्प परिसरातील मोठ्या प्रमाणात प्रसारित होणा-या स्थानिक वृत्तपत्रात (largely circulated local newspaper) पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित करणे बंधनकारक असतानाही ती येथील स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना ही प्रसिध्द करण्यात आलेली नाही. याचा अर्थ

या परिसरात जो पेपर वाचला जात नाही, अशा पेपरात जाणूनबूजन ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तसेच संवैधानिक पेसा कायद्यांतर्गत ही ग्रामपंचायत मोडत असल्याने ही जनसुनावणी आयोजित करण्यापूर्वी प्रकल्प विस्तारीकरणास ग्रामसभेची पूर्व मान्यता प्राप्त करणे बंधनकारक आहे. तशी पूर्वमान्यता ही घेण्यात आलेली नसल्याने ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी कायद्याच्या चौकटीत बसतच नाही. त्यामुळे ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे, तरी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी असे मत मी मांडतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या हरकती व आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

३) **एडव्होकेट राहूल पाटील, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत मान, तालुका, जिल्हा-पालघरः-**

भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद ४३ अंतर्गत "पेसा" कायदा हा निर्माण करण्यात आलेला आहे. पेसा कायद्याच्या कलम ४ नुसार कुठल्याही प्रकल्पाच्या स्थापनेसाठी, विस्तारिकरणासाठी संबंधित ग्रामपंयातीच्या ग्रामसभेचे अगोदर ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे.

याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी ओरिसा मायनिंग कॉर्पोरेशन विरुध्द पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली या याचिकेत कॉलम ६० मध्ये असे नमूद केलेले आहे की कुठलाही प्रकल्प ही "पेसा" कायद्यानुसार अधिसूचित क्षेत्रात (notified area) येत असेल, तर त्यास संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेची ना हरकत अगोदर (prior No Objection) प्राप्त करणे बंधनकारक (mandatory) आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी त्यासाठी अगोदर अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात सादर केल्याचा पुरावा मिळत नाही, तसेच त्यांनी ग्रामसभेची ना हरकत अगोदर (prior No Objection) प्राप्त केल्याचा पुरावा मिळत नाही. येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी ग्रामसभेच्या हक्कांचे उल्लंघन केलेले आहे.

**एडव्होकेट राहूल पाटील, माजी उपसरपंच,ग्रामपंचायत मान,तालुका,जिल्हा-पालघर** यांनी पुढे सांगितले की बुलेट ट्रेन सारख्या प्रकल्पासाठी तत्कालिन जिल्हाधिकारी, पालघर यांनी २०२२ साली येथील सर्व प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयांना प्रथम निवेदन

सादर करुन ग्रामसभेची पुर्वपरवानगी प्राप्त केलेली आहे. म्हणजे बुलेट ट्रेनसारख्या केंद्र शासनाच्या प्रकल्पासही ग्रामसभेची पुर्वपरवानगीची गरज भासते, तर कोणता नविन कायदा पारित झाला की या प्रकल्प विस्तारिकरणास ग्रामसभेची अगोदर ना हरकत प्रमाणपत्राची (prior No Objection Certificate) गरजच भासली नाही.

**एडव्होकेट राहूल पाटील, माजी उपसरपंच यांनी** मा. जिल्हाधिकारी,पालघर यांचे ग्रामपंचायतींना बुलेट ट्रेनसाठी ग्रामसभेचे अगोदर ना हरकत प्रमाणपत्र (prior No Objection Certificate) पारित करण्याच्या पत्राची प्रत दाखविली. तत्कालिन उप विभागीय अधिकारी, पालघर यांनी वॉट्सअपवर पत्राचा पाठविलेला फोटो त्यांनी सर्वांना दाखविला.

असे असताना पेसा कायद्यांतर्गत येणा-या ग्रामपंचायतींची ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसतानाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यघटनेच्या कलम १४ च्या मुलभूत हक्काचे (fundamental right) उल्लंघन करणारी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी कशी आयोजित केलेली आहे? जर कायद्यासमोर सर्व समान आहेत, तर पेसा कायद्यांतर्गत कलम ४ मधील तरतुदींनुसार विराज कंपनीने ग्रामसभेची ना हरकत अगोदर का घेतली नाही? याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा का केली नाही?

त्यामुळे ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर असून ग्रामस्थांच्या सवैधानिक अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी असे मी मत मांडत आहे.

त्यांनी पुढे सांगितले की भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत शुध्द पाणी, शुध्द हवा मिळणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यासाठीच आपल्या सर्व देशात प्रदूषण नियंत्रण मंडळांची स्थापना झालेली आहे. येथे आमच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत आहे. प्रशासनाची जबाबदारी आहे की अनुच्छेद ५१ अंतर्गत Duties of the State नुसार नागरिकांचे मुलभूत हक्कांचे संरक्षण करणे, ते नागरिकांना मिळून देण्याचीच प्रशासनाची जबाबदारी आहे.

जर बुलेट ट्रेनसारख्या सरकारी प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीची ना हरकत लागते, तर खाजगी प्रकल्पासाठी का घेण्यात आली नाही याबाबत उपस्थितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी स्पष्टीकरण द्यावे. तसेच आमचा भारताच्या न्यायव्यवस्थेवर आणि हक्क दिलेल्या भारतीय राज्यघटनेवर पूर्ण विश्वास असून आम्ही या प्रकल्पाच्या विरुध्द

सर्वोच्च न्यायालयातही लढा देऊन आमचा हक्क मिळविणार आहोत. तरी ही जनसुनावणी ही बेकायदेशीर असून ती त्वरित रद्द करण्यात यावी.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचना, हरकती यांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

**येथे श्री कुंदन संखे, तालुका, जिल्हा-पालघर** यांनी मध्ये बोलून सांगितले की आम्ही ब-याच जनसुनावणीत सहभाग घेतलेला आहे. दुसरे कोणीही बोलण्याअगोदर श्री राहूल पाटील यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर उत्तरे, स्पष्टीकरण अपेक्षित होते, ते देण्यात आलेले नाही. तरी त्याबाबत उत्तरे देण्यात यावीत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले ग्रामसभेचा ठराव नाही याची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे.

४) **श्री महेन्द्र मोरे, माजी सदस्य, जिल्हा परिषद-पालघर, मंडळ अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, बोईसर विभाग -**

येथे विराज प्रोफाईल्स कंपनीच्या विस्तारिकरणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे, ती बेकायदेशीर आहे, म्हणून त्याच्याविरुध्द आम्ही बोईसर विभागातील स्थानिक भूमीपुत्र येथे उपस्थित झालेलो आहोत. या कंपनीकडून पर्यावरणाचा नाश करण्याचे काम चालू आहे. सादरीकरणात अगदी अल्प प्रमाणात केलेले वृक्षारोपण, मुलांना शिक्षणासाठी थोडीशी केलेली मदत दाखवून स्थानिकांची आणि आमच्या आदिवासी बांधवांची दिशाभूल करण्याचे काम ही कंपनी करत आहे. येथे सर्वांना माहित आहे की विराज कंपनीच्या माध्यमातून अनेक व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. यास कारणीभूत असलेल्या कंपनीच्या पाठिशी प्रशासन का आहे?

उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बोईसर (पश्चिम), तालुका, जिल्हा-पालघर यांनी विराज प्रोफाईल्स कंपनीच्या विस्तारिकरणासाठी आयोजित केलेली ही जनसुनावणी ही पेसा कायद्यांतर्गत येणा-या ग्रामसभेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी असल्याने बेकायदेशीर असून ती रद्द करण्यात यावी ही आमची सर्वांची प्रामुख्याने मागणी आहे. या संदर्भात ग्रामस्थ **मान** गाव, तालुका,जिल्हा-पालघर यांनी दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी विशेष ग्रामसभा बोलावून प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरण करण्यास



VH

विरोध करणारा ठराव सर्वानुमते मंजूर केलेला आहे. तरी ही बेकायदेशीर जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

५) **श्री कुंदन संखे, राहणार-खैरापाडा, तालुका, जिल्हा-पालघरः-**

ज्यावेळी एखाद्या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार असेल, त्यावेळी प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य परिणाम/आघात व त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्पात आवश्यक असणारी पर्यावरण व्यवस्थापन योजना अंमलबजावणीची माहिती प्रकल्प बाधितांना, स्थानिकांना देण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित करण्यात येत असते. भारत सरकार किंवा महाराष्ट्र सरकारकडून काही सरकारी उद्योग स्थानिक विकासासाठी, जीडीपी (Gross Domestic Product) वाढविण्यासाठी, जिल्ह्याच्या विकासासाठी असे प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न होत असतो.

श्री कुंदन संखे यांनी येथे आक्षेप नोंदविला की मोठ्या स्क्रीनवर सूचना/आक्षेप नोंदविणा-याचा डिस्प्ले दर्शविण्यात येत नाही. आम्ही पालघर जिल्ह्याचे स्थानीक भूमीपुत्र आहोत. डिस्प्ले न दाखविता जनसुनावणी ही पुढे रेटण्याचा प्रयत्न चालू आहे. आतापर्यत अनेक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण्या झालेल्या आहेत, प्रत्येक ठिकाणी सूचना, हरकती नोंदविणा-याचा डिस्प्ले मोठया स्क्रीनवर दाखविण्यात येतो. बोलणारी व्यक्ती ही डिस्प्लेवर दिसलीच पाहिजे. ती प्रक्रिया येथे नाही, यास माझा स्पष्ट आक्षेप आहे.

त्यांनी सांगितले की जनसुनावणी ही जनतेची सुनावणी आहे. जनसुनावणी घेताना काही मूलभूत नैतिकता (basic ethics) आहे. त्यात पहिले basic ethics म्हणजे ज्यावेळी वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प येतात, त्याचा जिल्ह्याच्या, राज्याच्या, देशाच्या प्रगतीवर परिणाम होत असतो. असे प्रकल्प स्थापन करण्यापुर्वी जनतेच्या भावना जाणून राज्याच्या व देशाच्या हितासाठी असे प्रकल्प सुरु करणे आवश्यक असते. त्यामुळे ब-याच वेळा जनता ही सहकार्य करत असते. खाजगी उद्योग उभारताना तेथील रोजगाराची संधि वाढेल असा एमओयु शासनाबरोबर करतात. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी हे जनतेचे पर्यावरणविषयक सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदविण्यासाठी आहे.

आम्ही मागणी करतो की प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरताच जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

हे महाराष्ट्रातील पहिलेच उदाहरण असेल की ज्या उद्योगाच्या विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, त्या प्रकल्पाच्या बाजूसच जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. आजची जनसुनावणी ही कंपनीच्या मालकीच्या जागेत ठेवलेली आहे. म्हणजे जनसुनावणी ही जनतेवर कुठलाही दबाव न येता पारदर्शक पध्दीने जनसुनावणी आयोजन व्हावे या निर्देशांचे उल्लंघन आहे. येथे नैसर्गिक न्यायापासून स्थानिकांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे हे जनसुनावणी रद्द करण्याचे ठोस कारण आहे. ही जनसुनावणी ही प्रकल्प प्रवर्तकांच्या घरातच घेतल्यासारखे आहे.

जर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही तटस्थ व पारदर्शक घ्यावयाची होती, तर जवळपासच्या परिसरात सार्वजनिक जागा, शासकीय शाळांमध्ये जागा उपलब्ध आहेत. तरी जिल्हा प्रशासनाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्रयस्थ जागी/सार्वजनिक जागी ही जनसुनावणी आयोजित करणे योग्य होते. हा आमच्या हरकतींचा ठोस मुद्दा आहे. मात्र ज्या उद्योगाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे, ती त्याच्या मालकीच्या जागेतच होत आहे, हे कायद्याचे, पारदर्शकतेचे उल्लंघन आहे. तरी ही जनसुनावणी रद्द व्हावी ही आमची ठाम मागणी आहे.

दुसरा मुद्दा एडव्होकेट राहूल पाटील यांनी सांगितलेला आहे. असे म्हटले जाते की "ना विधानसभा, ना लोकसभा, सबसे बडी ग्रामसभा" यानुसार येथील ग्रामसभा ही शासनाने पेसा कायद्यांतर्गत भारताच्या राज्यघटनेने संरक्षण दिलेले आहे. यात सुप्रीम कोर्टापर्यंत जावे लागते, तेव्हाच पेसा कायद्यांतर्गत सुट मिळेल की नाही हे ठरविले जाते. हा शासकीय प्रकल्प नाही. या प्रकल्पात शासनाचा कुठलाही हिस्सा नाही. पेसा कायद्यांतर्गत खाजगी प्रकल्पास ग्रामसभेच्या ठरावाचे उल्लंघन करता येईल काय? आपला पालघर जिल्हा ही ०१ ऑगस्ट, २०१४ साली निर्माण झाला. त्याचे कारण आदिवासी समाज, बहुजन समाज यांना पालघर जिल्ह्यात संरक्षण मिळावे. जो आदिवासी समाज जो समाजाच्या प्रवाहाच्या बाजूला आहे, त्यास संरक्षण मिळावे. पेसा कायद्यांतर्गत त्यास वेगळे नियम करुन दिलेले आहेत. ज्या महसूल क्षेत्रात हा प्रकल्प उभा राहत आहे, त्या ग्रामपंचायतीचे नांव **मान** ग्रामपंचायत आहे. त्या **मान** ग्रामपंचायतीस १३ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पत्र प्राप्त झालेले आहे. कुठल्याही विषयासाठी ग्रामसभा ही घ्यावी लागते. तो गावाचा अधिकार



VH

असतो. नियमानुसार सहा दिवसांची बैठकीची विषय सूची (agenda) ही काढावी लागते. १३ / १४ मार्चनंतर बैठकीची विषय सूची (agenda) काढण्यात आला आणि २४ मार्च, २०२६ ला नियमानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. ग्रामसभेत ४६८ पेक्षा जास्त व्यक्तींनी प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास विरोध नोंदविलेला आहे. त्यामुळे ग्रामसभेस जो अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे, त्या पेसा क्षेत्रातील कायद्याचे, पेसा क्षेत्रातील ग्रामसभेच्या अधिकाराचे संपूर्णपणे उल्लंघन आहे, त्यामुळे आज जी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक चालू आहे, ती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रकल्प विस्तारिकरणास विरोध हा ग्रामसभेच्या ठरावाव्दारे केलेला आहे. त्यामुळे जो नैसर्गिक न्याय व अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे, किमान खाजगी उद्योगाकरिता, पेसा क्षेत्रातील कायद्याचे, पेसा क्षेत्रातील ग्रामसभेच्या अधिकाराचे पूर्णपणे उल्लंघन आहे. त्यामुळे आपली आजची जबरदस्तीने चालू असलेली ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. तरी आपण प्रकल्प विस्तारिकरण नामंजूर करावे ही आमची ठोस मागणी आहे.

त्यांनी सांगितले की २०१२ मध्ये विराज उद्योगाने जनसुनावणी नागझरी नाक्याच्या शाळेत ठेवलेली होती. २०१२ मध्ये विराज उद्योगसमुहाच्या माध्यमातूनच पर्यावरणविषयक जनसुनावणी झाली.

त्या जनसुनावणीत त्यावेळी स्थानिक भुमीपुत्रांनी सूचना, हरकती उपस्थित केल्यानंतर प्रकल्प प्रवर्तक यांनी लोकांना आश्वासित केले की आमच्याकडून कधिही कुठल्याही स्वरुपात प्रदूषण होणार नाही. आमच्या प्रकल्पात स्थानिक भूमीपुत्रांनाच रोजगाराच्या संधित प्राधान्य देण्यात येईल. कंपनी स्थानिकांसाठी प्रशिक्षण आयोजित करेल.

तर २०१२ पासून २०२६ पर्यंत येथील विविध गावात किती सीएसआर निधी उपलब्ध करुन देण्यात आला, किती स्थानिक पुत्रांना रोजगारक्षम प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधि दिली? या चवदा वर्षात प्रकल्प प्रवर्तकांनी खोटे पाडलेले आहे. याही वेळेस ते आमच्या स्थानीक गरीब जनतेची फसवणूकच करणार आहेत. आता सादरीकरणात जे आश्वासने दिली आहेत, ती सर्व आश्वासने २०१२ सालीसुध्दा देण्यात आलेली होती.

तरी मागील २०१२ च्या जनसुनावणीत दिलेली वचने न पाळल्याने या प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये. त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विचारणा केली की हा प्रकल्प कुठल्या संवर्गातील (category) आहे?

आयोजक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा संवर्ग ए - रेड कॅटगरीत मोडत आहे.

श्री संखे यांनी सांगितले की माझ्या हरकतीचा मुद्दा -याची नोंद घेण्यात यावी. तारापूर औद्योगिक वसाहत आपल्या बाजूलाच आहे. महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक महामंडळाने ती वसविलेली आहे. तेथे इतर कारखाने आहेत. तसेच विराज उद्योगाचेही कारखाने आहेत. महाराष्ट्र शासनाने आशियातील सर्वात मोठी वसाहत म्हणजे तारापूर औद्योगिक वसाहत स्थापन केलेली आहे. आम्ही कुठल्याही प्रकल्पाच्या विरोधात नाही. त्यांनी विचारणा केली की संबंधित प्रकल्प हा कुठल्या झोनमध्ये आहे, म्हणजे रेड झोन, ऑरेंज झोन का ग्रीन झोन. प्रकल्प एमआयडीसीत आहे की नॉन- एमआयडीसी झोन मध्ये आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले प्रस्तावित प्रकल्प हा नॉन-एमआयडीसी क्षेत्रात आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात येत असलेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. हा अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. तरी अगोदर उपस्थित केलेले मुद्दे परत परत उपस्थित करु नये, म्हणजे इतर वक्त्यांना वेळ कमी पडू नये. त्यांना संधि देण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की एडव्होकेट राहूल पाटील यांनी पेसा ग्रामपंचायत असूनही त्याची पूर्वपरवानगी घेतलेली नाही याची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री संखे यांनी येथे मत मांडले की येथे असे दिसून येते की उद्योगासाठी आरक्षित नसलेल्या भूखंडावर रेड कॅटेगरीचा कारखाना विस्तारिकरण करण्यात येणार आहे.

दुसरी गोष्ट या प्रकल्पाला लागूनच सूर्या नदीचे पाटाचे पाणी आहे. प्रकल्प स्थानापासून साधारणपणे ३.० (तीन) कि.मी. अंतरावरुन सूर्या नदी ही वाहत आहे आणि परिघाचा विचार केल्यास ती १.५ (दीड) कि.मी. अंतरावरुन वाहत आहे. या सूर्यानदीपासून सिंचनासाठी शेतीसाठी पाटाचे पाणी देण्यात आलेले आहे. शासनाचे धोरण आहे की शेतकरी स्वावलंबी झाला पाहिजे.

आमचा आक्षेप आहे की शेतीचे पाणी हे सम्प करुन कित्येक लाख लिटर पाणी हे उद्योगासाठी वापरण्यात येते. सूर्या नदीचे उद्दिष्ट हे पालघर,वसई, विरार,मीरा-भाईंदरला

पाणी पुरविणे, म्हणजे सूर्या नदी हे आपले जीवन आहे, आपले अस्तित्व आहे. आम्ही सूर्या नदीचे पाणी पिऊनच जगत आहोत. ते नदीचे पाणी एखादा उद्योग जर खराब करत असेल, तर त्यावर कारवाई करण्याचे काम हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने करणे आवश्यक आहे. हे सिंचन क्षेत्रातील पाटाचे पाणी शेतीचे लाखो लिटर पाणी या उद्योगात वापरण्यात येणार आहे.

तसेच आताच स्पष्टीकरण देण्यात आले की हा प्रकल्प नॉन-एमआयडीसीमध्ये आहे, महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचित (notified) औद्योगिक क्षेत्रात नाही. प्रकल्प उत्पादनासाठी शेतीच्या सिंचनातील लाखो लिटर पाणी वापरण्यात येणार आहे. मग प्रकल्प उत्पादनात पाणी वापरल्यानंतर त्याचे निःस्सारण (discharge) होणारच. येथे सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP) नाही. तारापूरला अनेक कंपन्या आहेत. त्या कंपनीतील औद्योगिक सांडपाणी हे त्या कंपनीतील औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात (ETP) प्रक्रिया करून ते नंतर तारापूरच्या सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP) सम्पने सोडले जाते, तेथे त्यावर प्रक्रिया करुन न्युट्रल करुनच समुद्रात सोडले जाते. येथे येथे सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP) नाही. कंपनी अवैधपणे शेतीचे लाखो लिटर पाणी वापरुन त्यांच्या उत्पादनासाठी वापरुन लाखो लिटर्स सांडपाणी निर्माण करणार, पाटाचे पाणी उत्पादनासाठी दुषित करणार. असा प्रकल्प नॉन-एमआयडीसी म्हणजे हरित क्षेत्रात/ग्रीन झोनमध्ये असणे हे पर्यावरणास धोका आहे. येथे सीईटीपी नाही. कंपनी जरी शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प सांगेल, पण झेडएलडी सांगून येथील कंपन्या सांडपाणी सोडतात. प्रकल्प उत्पादन प्रक्रियेमुळे जे धुलीकण वातावरणात सोडण्यात येतील, ते वातावरणात सोडल्याने येथे हवा प्रदूषित होईल. सूर्या नदीच्या पाण्याचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे. तरी प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये.

आमची प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की जेथे महाराष्ट्र शासनाचे अधिकृत्त औद्योगिक क्षेत्र (notified industrial zone) आहे, म्हणजे जेथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) असेल, तेथे हा प्रकल्प घेऊन जावा. आम्हीसुध्दा शासनास सर्वजण पत्र देण्यास तयार आहोत की ही प्रकल्प जेथे रेड संवर्गातील कारखाने आहेत, तेथे तो नेण्यात यावा.

काही वर्षांपूर्वी येथे केंद्र सरकारने टेक्सटाईल पार्क आणलेला होता. संभाव्य प्रदूषण लक्षात घेऊन तो रद्द करावा लागला. करमतारा बाबत स्थानिकांनी मोठ्या प्रमाणात आक्षेप उपस्थित केले, कारण तो सूर्या नदीच्या बाजूलाच होते.

तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की त्यांनी या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये. आमचा निसर्गरम्य असलेला परिसराचे नंदनवन टिकवून ठेवावे. या जनसुनावणीच्या माध्यमातून प्रस्तावित प्रकल्प हा लोकांच्या हिताचा नाही हे कळवावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

६) <u>श्री समीर मोरे, स्थानिक भूमीपुत्रः-</u>

या जनसुनावणीत जो जनआक्रोश दिसत आहे, तो विराज कंपनीच्या भूतकाळातील कृत्यांचा आहे. या कंपनीमुळे जे जल व वायू प्रदूषण होत आहे, त्याचा परिणाम जनतेवर झालेला आहे. त्या परिणामांच्या भितीपोटी आता या उद्योगाला विस्तारिकरणाची परवानगी मिळू नये असे सर्व भूमीपुत्रांचे म्हणणे आहे.

प्रकल्पात जी पिकलिंग प्रक्रिया करण्यात येते, त्यात हायड्रो-क्लोरिक एसिड व नाइट्रिक एसिड वापरले जाते, ते एसिड निघणा-या सांडपाण्यातून/ Effluent मधून नदी, नाले, बोअरवेल, विहिरीच्या पाण्यात जाईल या भितीने सर्वजण विरोध करत आहेत.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस माझी विनंती आहे की तारापूरच्या प्रदूषणाची सद्य स्थिती काय आहे हे सांगण्याची गरज नाही. विराज कंपनीने कार्यरत कंपनीतील जे अस्तित्वात असलेले जे औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (ईटीपी) प्रकल्प आहेत, त्यातून जो प्रदूषित वायू/धूर उत्सर्जित केला जातो, त्याचे नियंत्रण करण्यात यावे. या उद्योगामुळे होणारे अपघात आणि रस्ते अपघात टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना अंमलात त्वरित आणावी. या प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे, या परिसरातील संपूर्ण पाणी खराब होणार आहे. येथील निसर्ग सौदर्य हे पुर्णपणे खराब होणार आहे.

कार्यरत प्रकल्पात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले निर्देश जर पाळले जात नसतील, तर अगोदरच ज्यांच्यावर विविध प्रकारचे आरोप आहेत, येथील त्या सर्व उद्योगांना विस्तारिकरणाची परवानगी देण्यात येऊ नये.



VH

ही जनसुनावणी जर प्रशासनाने रेटून पुढे चालू ठेवली, तर आमच्याकडील विविध सनदशीर मार्ग, आंदोलने आम्ही अंगिकारणार आहोत. मी येथे पोलिस प्रशासनास विनंती करेल की आम्ही आंदोलन केले की सु-मोटो गुन्हे दाखल करतात, तशा प्रकारे आपण विराज प्रशासनावर गुन्हे दाखल करावेत, कारण त्यांनी खूप लोकांचे आयुष्य बरबाद केलेले आहेत. आणि आज या जनसुनावणीनंतर येथे आलेल्या जनतेवर रोष ठेऊन वागणूक देणार असेल, तर गाठ आमच्याशी आहे हे लक्षात ठेवावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**७) <u>श्री अविनाश पाटील, कुणबी सेना पालघर जिल्हाध्यक्षः-</u>**

वास्तविक पहाता खरे तर या जनसुनावणीस ग्रामसभेने विरोध केलेला आहे. लोकांनी निवडून दिलेले येथील लोकप्रतिनिधी, स्थानिक आमदार यांनीसुध्दा विरोध केलेला आहे. तरीसुध्दा आपण जबरदस्तीने ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे, याचा आम्ही निषेध करतो. प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास विरोध करणारे लेखी निवेदन आम्ही सादर केलेले आहे. तरीसुध्दा येथील भूमीपुत्र, स्थानिक शेतकरी म्हणून काही हरकतीचे मुद्दे येथे उपस्थित करत आहे.

जरी प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प **मान** आणि वारांगडे या गावात होत असला, तरीही त्याचा परिणाम हा १० कि.मी. परिघात होणार आहे. हा संवर्ग ए मधिल प्रकल्प असून याचे भीषण परिणाम आगामी काळात होणार आहेत. वास्तविक पहाता गेले २५-३० वर्षे हा प्रकल्प येथे कार्यरत असून तो ९.७ हेक्टरमध्ये कार्यरत आहे. प्रस्तावित विस्तारिकरण हे ४१.४४ हेक्टर क्षेत्रात होणार आहे. जर ९.७ हेक्टरमधील प्रकल्पाचे भीषण परिणाम झालेले आहेत, तर जवळजवळ १०-११ पट वाढणा-या प्रकल्पामुळे किती भीषण परिणाम होतील?

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पासाठी ४,२०० केएलडी पाणी लागणार आहे, म्हणजे साधारणपणे ४२ लाख लिटर रोज पाणी लागणार आहे. ते कोठून घेण्यात येईल (source of water supply), त्या स्त्रोताची शाश्वत क्षमता (sustainability yield) किती आहे याचा अधिकृत्त अभ्यास उपलब्ध करुन देण्यात यावा.

भूजल उपसा घेणार असल्यास संबंधित केंद्र शासनाच्या CGWA ची परवानगी आणि हायड्रोलॉजिक अभ्यास अहवाल दाखविण्यात यावा.

प्रत्यक्षात झिरो लिक्विड डिस्चार्ज कसा साध्य करणार याचे तांत्रिक व फ्लो चार्ट क्षमता उपलब्ध करण्यात यावेत.

याठिकाणी रासयनिक वापर व जल व हवा प्रदूषण होणार आहे. NO२, SO२, H२SO४, HNO३, HCl यांचा दररोजचा व वार्षिक वापर किती होणार आहे याची माहिती उपलब्ध करण्यात यावीत.

तसेच साठवण सुरक्षा आराखडा उपलब्ध करण्यात यावा,

अतिशय घातक अशी रसायने, एसिड्स येथे वापरली जाणार आहे.

एसिड फ्युम्स, NOx, SOx यांचा मॉडेलिंग डेटा, स्थानिक वा-याचा वेग दाखविला पाहिजे.

सांडपाण्याची क्षमता, ईटीपी क्षमता, आऊटलेट मानके दाखविली पाहिजेत.

ईआयए तयार करताना बेसलाईन डेटा किती काळ घेतला, तो मान्सुन, हिवाळा व उन्हाळा या तीन ऋतूत घेतला का,

आपत्ती व्यवस्थापन आराखडा (Disaster Management Plan- DMP), रासायनिक गळती, आग, स्फोट प्रसंगी ५ कि.मी. परिघातील संभाव्य परिणामांचा अभ्यास आरोग्य परिणाम स्वतंत्रपणे केला आहे काय, असल्यास तो अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा,

या प्रकल्पामुळे ४९ गावे, ५२,००० कुटुंबे आणि सुमारे सव्वा दोन लाख लोकसंख्या बाधित होणार आहेत.

रोजगार आणि एमओयु दावे ३,५०० लोकांना रोजगार हमी, त्यासाठी कायद्याचे बंधनकारक अट कुठे आहे, करार दाखविण्यात यावेत.

बोईसर येथील विद्यमान प्रकल्पात किती स्थानिक व किती परप्रांतीय कामगार आहेत, अधिकृत्त आकडे उपलब्ध करण्यात यावेत,

या भागात येणा-या सुमारे ५-१० वर्षात नविन रहिवाशी येतील, तरी त्यामुळे हवा, पाणी प्रदूषणाचा अभ्यास अहवाल आहे का, शाळा, गावे, गृहनिर्माण संकुले, यांच्या अंतरांचा नकाशा दिला पाहिजे.

खरे तर मानवी वस्तीपासून औद्योगिक क्षेत्राचा अभ्यास केलेला आहे का, त्याचा साईड एनॅलिसिसि अहवाल उपलब्ध करण्यात यावा



VH

पिण्याच्या पाण्यावर परिणाम होणार नाही याची लेखी हमी तयार आहे काय, रासायनिक गळती झाल्यास कंपनी संचालक वैयक्तिक जबाबदारी स्विकारतील काय, याबाबत लेखी अहवाल स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावेत.

म्हणून आमचा या प्रकल्पास ठाम विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

८) **श्री कुंदन संखे, राहणार-खैरापाडा, तालुका, जिल्हा-पालघर -**

यांनी परत आक्षेप नोंदविताना मत मांडले की आमच्या सर्वांचेच म्हणणे आहे की ही बेकायदेशीर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. तरी याविषयी आपण आपले मत मांडावे. सुरवातीस सादरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच श्री राहूल पाटील यांनी कोर्टाचा निर्णय सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने आपणास बंधनकारक आहे की ही जनसुनावणी त्वरित रद्द करावी अशी आमची मागणी आहे.

त्यावेळी उपस्थित एकत्रिपणे जनसुनावणी रद्द करण्याची घोषणा देत होते.

९) **एडव्होकेट राहूल पाटील, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत मान, तालुका, जिल्हा-पालघरः-**

यांनी मत मांडले की त्यांनी सादर केलेले निर्णय हा मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी पारित केलेला असून तो सर्वांनाच बंधनकारक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जर आपण कार्यवाही केली नाही तर Contempt of Supreme Court होऊ शकते. तरी त्याची दखल घेण्यात यावी. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उत्तर अपेक्षित आहे. पेसा ग्रामपंचायत बाबतच मा. सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण सुप्रीम कोर्टाच्या निकालाबाबत उपस्थित केलेले विचार, हरकती यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ज्यावेळी बैठकीचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येईल, त्यावेळी संबंधित नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) त्याबाबत दखल घेईल. या मुद्द्याबाबत नियामक प्राधिकरण (regulatory authority) हे नेहमीच गांभार्याने दखल घेतच असते. सुप्रीम कोर्टाच्या निकालाची गांभार्याने दखल घेतल्याशिवाय प्रकल्पास मंजूरी देता येतच नाही. हा बैठकीच्या इतिवृताचा भागच होणार आहे.

त्यावेळी **एडव्होकेट राहूल पाटील** यांनी मत मांडले की निमागिरीचे सुप्रीम कोर्ट निकाल याची नोंद घेण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. तरी दुस-या व्यक्तीला बोलण्याची संधि देण्यात यावी.

**एडव्होकेट राहूल पाटील यांनी** मागणी केली की ही जनसुनावणी आहे. तरी बैठकीचे इतिवृत्त स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीचे इतिवृत्त सर्व प्रकल्प प्रभावीत/ बाधित ग्रामपंचायत कार्यालयांना, जिल्हाधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ व सर्व नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) यांच्या संकेतस्थळावर जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

१०) **श्री कुंदन संखे यांनी** मागणी केली की बैठकीचे इतिवृतासोबत बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग मिळेल काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीचे इतिवृत्ताचा रेकॉर्डिंग हा भाग आहे. नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) ते रेकॉर्डिंग त्यांच्या संकेतस्थळावर टाकत असतात.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

११) **श्री डायरन डिमेलो, स्थानीक भूमीपुत्र, राहणार- मान गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

सुप्रीम कोर्टाच्या निकालाची दखल घेऊनही ही जनसुनावणी आपण चालू ठेवलेली आहे. तर सुप्रीम कोर्टाचा निकाल बेदखल करुन आपण जनसुनावणी ही चालू करणार आहात असे जाहिर करा, नंतरच आम्ही पुढील प्रश्न विचारु.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे व सुप्रीम कोर्टाने पारित केलेल्या निकालाबाबत उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल.

ते इतिवृत्त नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) यांना सादर करण्यात येते. याबाबत पुढील निर्णय नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) घेत असते.

१२) त्यावेळी **एडव्होकेट राहूल पाटील** यांनी मत मांडले की २४३ अंतर्गत पेसा कायद्याची निर्मिती १९९६ साली करण्यात आलेली आहे. त्याच्या कलम ४ अंतर्गत तो आमचा घटनेने दिलेला अधिकार आहे. आपणास ते बंधनकारक आहे की नाही हे जाहिर करण्यात यावे. आमता घटनेने दिलेला अधिकार आहे की आमच्या ग्रामसभेची मान्यता ही घेतलीच पाहिजे. ती का घेण्यात आली नाही? शिवाय सुप्रीम कोर्टानेही निकाल दिलेला आहे की पेसा ग्रामपंचायतची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या हरकतीची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येऊन ते सर्व शासनाच्या नियामक प्राधिकरणाकडे (Regulatory Authority) सादर करण्यात येणार आहे. त्याबाबत पुढील निर्णय हा नियामक प्राधिकरण (Regulatory Authority) घेईल. तरी आता आपणास विनंती आहे की दुस-या व्यक्तीस बोलण्याची संधि देण्यात यावी.

श्री डिमेलो यांनी आक्षेप नोंदविला की जनसुनावणीची वेळ आमच्या ग्रामपंचायतीस पाठविलेल्या नोटिसमध्ये नव्हती. मात्र आपण येथे सकाळी ११.०० हजर होता. ११.०० वाजता जनसुनावणी आपण सुरु केली, त्यावेळी स्थानिक लोक मंडपात नव्हते. तरी ग्रामपंचायतीस जी नोटिस पाठविण्यात आली, त्याचे वाचन येथे बैठकीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी करावे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची ०४-०३-२०२६ तारखेची नोटीस ही ग्रामपंचायतीस १३-०३-२०२६ ला मिळाली. त्यात जनसुनावणीची वेळ ही लिहिलेली नाही. जर वेळ लिहिलेली नाही, तर कोणत्या अधिका-याखाली ही जनसुनावणी ११.०० वाजता चालू केली. ही दडपशाही आहे. प्रशासनातील अधिकारी हे असंवैधानिक कामे करत आहे, हे देशाचे दुर्दैव आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१३) **श्री संज्योत राऊत, भूमीपुत्रः-**

या जनसुनावणीच्या अनुषंगाने जो सुप्रीम कोर्टाचा जो निर्णय आहे, तो आपण उतघृत करावे आणि ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.

दुसरी गोष्ट अशा पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण्या होतात, स्थानिक लोकांचा विरोध असतो, तो असूनसुध्दा जिल्हाधिकारी त्यांच्या विशेषाधिकारात आदेश काढतात की प्रकल्पास मान्यता दिलेली आहे.

तिसरी गोष्ट अशी आहे की संविधानाचा आदर ठेऊन मला बोलायचे आहे की येथे हजारो लोक आलेले आहेत. सगळ्यांचे म्हणणे आहे की या विस्तारिकरण प्रकल्पास आमचा विरोध आहे आणि ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. तरी अध्यक्ष यांनी जाहिर करुन सांगावे की जनतेचा या विस्तारिकरण प्रकल्पास विरोध असल्याने मी आदेशित करतो की विराज कंपनीचे विस्तारीकरणाचे प्रकल्प रद्द करण्यात येत आहेत, असा आदेश काढण्यात यावा. आपण ना आदेश काढत, ना सुप्रीम कोर्टाच्या आदेशाबाबत बोलत, ना आपण कशाबद्दल बोलत. मी शेतकरी सभेतर्फे आलेलो आहे. कंपनीमुळे जे पाण्याचे प्रदूषण होत आहे, जे जमिनीचे प्रदूषण होत आहे, माझ्या शेतकरी सभेतर्फे निवेदने दिली, पण त्याबाबत कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही.

तसेच बैठकीस येथील स्थानिक कार्यकर्ते पोहचू नये अशीच व्यवस्था करण्यात आलेली होती. ती आपण केली की प्रशासनाच्या अधिका-यांच्या सांगण्यावरुन करण्यात आली,की विराज प्रशासनाने केली हे माहित नाही. पण लोक येथे येऊच नये अशी आखणी करण्यात आलेली होती. लोकशाहीत लोकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न आहे. पण कोणीही लोकांचा आवाज दडपू शकत नाहीत. जनसुनावणीचा हा फार्स ठेवत आहेत, याचा मी निषेध करतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१४) **श्री अशोक शिंगाडा, उलगुलान ब्रिगेड अध्यक्ष, आदिवासी कार्यकर्ताः-**

येथे एडव्होकेट राहूल पाटील यांनी सांगितलेले आहे की निमागिरी जजमेंटच्या संदर्भात ग्रामसभेने ठराव मंजूर केला की आम्हांला प्रकल्प नको आणि सुप्रिम कोर्टाने त्याचा मान ठेवला, त्या अनुसुचित क्षेत्राचा, ग्रामसभेचा मान ठेवला, आणि वेदान्त कंपनीस



VH

खडकावून सांगितले की येथे प्रकल्प राबविता येणार नाही. कारण हे क्षेत्र हे अनुसुचित क्षेत्र असून आदिवासी समाजाचे आहे. आदिवासीना त्यांच्या क्षेत्रात स्वनियंत्रणाचा आणि स्वशासनाचा अधिकार आहे. सुप्रीम कोर्टाने आदिवासींच्या बाजूने निकाल दिला. तर आपण सुप्रीम कोर्टापेक्षा मोठे आहेत का?

आता दुसरा सुप्रीम कोर्टाचा निर्णय सांगतो -समता जजमेंट. समता जजमेंटचा प्रशासनाने अभ्यास करावा. समता जजमेंटनुसार तुमची किंवा केंद्र सरकारची एक इंचही जमीन अनुसुचित क्षेत्रात नसते, जोपर्यंत ग्रामसभा संमती देत नाही. तुम्हांला कायदा माहित असतानाही आपण जाहिर का करत नाहीत येथील भूमीपुत्रांचा, येथील आदिवासी समाजाचा प्रकल्पास विरोध आहे म्हणून ही जनसुनावणी रद्द करत आहे असे जाहिर का करत नाहित?

जर ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जर रद्द् केली नाही आणि येथे जर आदिवासी बंधु भगिनींचा उद्रेक झाला, तर त्यास जबाबदार जिल्हा प्रशासन असेल, कारण ते सुप्रीम कोर्टाचा अपमान करत आहात, आम्ही नाही. आम्ही संविधानमान्य मार्गाने आपणास ही बेकायदेशीर जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केलेली आहे. या विराज कंपनीच्या चारी बाजूने जे पाडे आहेत, ते आदिवासी समाजाचे आहेत.

तुम्हाला विनंती आहे की आदिवासी समाजाची संस्कृत्ती, परंपरा, रुढी बिघडू नये, त्यात कुठल्याही प्रकारची बाधा येऊ नये म्हणूनच भारतीय राज्यघटनेने आम्हांला ५ वी अनुसुची दिली आणि १९९६ ला पेसा कायदा अस्तित्वात आला आणि पेसा कायद्यांतर्गत कलम ४ नुसार आदिवासी प्रथा जपण्याचा आम्हांला अधिकार दिलेला आहे.

या विराज कंपनीत शेकडो, हजारो परप्रांतीय आहेत. ते आमच्या आदिवासी पाड्यांच्या चाळीत राहतात. त्या चाळीत १००-२०० परप्रांतीय राहतात. त्यांच्या वर्तणुकाचा आमच्या समाजावर परिणाम होत आहे. हे असंविधानिक आहे.

आम्हा आदिवासी समाजाला शुध्द पाणी मिळत नाही. शुध्द हवा मिळत नाही. भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल २१ नुसार शुध्द पाणी, हवा, पर्यावरण, आरोग्य हे मिळण्याचा अधिकार दिलेला असताना, जगण्याचा अधिकार दिलेला असताना तो हिरावून घेण्याचा अधिकार आपणास आहे काय?

तरी आज विनंती आहे की तुम्ही ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी येथेच रद्द करण्यात यावी. ग्रामसभेचा विरोध आहे, त्यामुळे तुमचा प्रकल्प हा होणारच नाही. अन्यथा आम्ही कोर्टात गेलो तर प्रतिवादी म्हणून पहिले आपण असाल याची नोंद घ्यावी.

प्रकल्पाच्या व्यवस्थापनास आम्ही अंतिम इशारा देतो की आदिवासी क्षेत्रात कंपनीची दादागिरी चालणार नाही. ग्रामसभेचा विरोध आहे, त्यामुळे तुमचा प्रकल्प हा होणारच नाही. तसेच पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना आवाहन करतो की त्यांनी जाहिर करावे ते सुप्रीम कोर्टापेक्षा मोठे आहेत, नाहीतर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१५) **<u>श्री अमोल गर्जेः-</u>**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपस्थित अधिका-यांना प्रश्न विचारत आहे की विराज कंपनी प्रदूषण करते की नाही करते याचे पूर्ण पुरावे असलेली ही फाईल आहे असे सांगत त्यांनी फाईल दाखविली. विराज कंपनी ही घातक जल, वायू प्रदूषण करते, तसेच तारापूर औद्योगिक वसाहतीत (जी-३ व जी-४) जे विराज कंपनीचे प्रकल्प आहेत, ते किती घातक प्रदूषण करत आहेत याची सर्व माहिती या फाईलीत आहे. ही फाईल फक्त मप्रनि मंडळाकडे नाही, तर स्टेजवर असलेले अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-पालघर त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी-पालघर यांच्याकडे फाईल आहे.

म.प्र.नि. मंडळाने विराज कंपनी एवढे घातक प्रदूषण करत असताना फक्त कारणे दाखवा नोटीसच का पाठविण्यात आलेली आहे, त्यापेक्षा कडक कार्यवाही का करण्यात आली नाही आणि विराज कंपनीच्या मालकीच्या जागेतच ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी का लावण्यात आली याचे उत्तर येथे या बैठकीत प्रथम देण्यात यावे. कंपनीच्या मालकीच्या जागेत ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केली याचा आम्ही निषेध करतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१६) **श्री डायरन डिमेलो, स्थानीक भूमीपुत्र, राहणार- मान गाव, तालुका, जिल्हा-पालघर** यांनी परत आक्षेप नोंदविताना सांगितले की आमचा मूळ मुद्दा तसाच आहे. आपण जाहिर करावे की सुप्रीम कोर्टाचा निकाल आम्हांला बंधनकारक नाही. तुम्ही तसे जाहिर करा, मग आम्ही आमचे मुद्दे परत मांडतो.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर देताना सांगितले की मी वारंवार उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करत असलेल्या सर्व मुद्द्यांची, सूचना/आक्षेप यांची नोंद घेण्यात येत असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. तरी आतापर्यंत ज्या सूचना, हरकती आक्षेप उपस्थित करण्यात आले, त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येणार आहे. ते इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेत असते. तसेच बैठकीचे इतिवृत्त हे प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध असणार आहे. तरी इतरांनाही बोलण्याची संधि देण्यात यावी ही विनंती.

श्री डिमेलो यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की आमची दुसरी मागणी ही म.प्र.नि.मंडळाने ग्रामपंचायत **मान**ला पाठविलेली नोटीस ही बैठकीत वाचून दाखविण्यात यावी. त्या नोटिसीमध्ये वेळ देण्यात आलेली आहे का ते तपासावे.

अध्यक्ष यांनी श्री डिमलो यांना सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार (EIA Notification, २००६) प्रस्तावित प्रकल्पाबाबतची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना ही एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत आणि एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत तीस दिवस अगोदर प्रकाशित केलेली आहे. त्या जाहिर सूचनेत बैठकीचे स्थान, दिनांक व वेळ ही उदघृत केलेली आहे. पेपरात प्रसिध्द करण्यात आलेली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना ही सर्वांसाठीच असते. त्यात बैठकीची वेळ सकाळी ११.०० वाजण्याची आहे असे स्पष्ट दिलेले आहे.

श्री डिमेलो यांनी आक्षेप नोंदविला की पेसा कायद्याबाबत आपली मते जाहिर करा, सुप्रीम कोर्टाचा आदेश आपणास बंधनकारक नाही याबाबत सांगा. मग आम्ही आमची मते बैठकीत मांडू.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की माझी विनंती आहे की मी ४-५ वेळा सांगितलेले आहे की आपण उपस्थित केलेल्या हरकतींची नोंद घेण्यात आलेली आहे.

तरीही श्री डिमेलो त्याच त्याच हरकती नोंदवित होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपण ज्या पर्यावरणीय सूचना, हरकती वा आक्षेप उपस्थित करत आहे, त्यांची नोंद घेऊन त्याचा इतिवृतात समावेश करणे व ते इतिवृत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सादर करणे. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत सर्व हरकती,सूचनांबाबत पुढील कार्यवाही करते.

श्री डिमेलो यांनी परत आक्षेप नोंदविला की हा जनआक्रोश आपणास दिसत नाही का?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री डिमेला यांना दुस-या व्यक्तींना संधि देण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१७) त्यावेळी **एडव्होकेट राहूल पाटील** यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सांगितले की सर्वांतर्फे विनंती आहे की आपणास जे सुप्रीम कोर्टाचे जे जजमेंट दिलेले आहे, त्यातील ६० नंबरचा परिच्छेद सर्वांना वाचून दाखविण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनसुनावणीचा उद्देश व संकल्पना (scope of public hearing) ही प्रथम सर्वांनी समजून घ्यावी. जनसुनावणीत स्थानिक, प्रकल्पबाधित लोकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, टीकाटिप्पणी, हरकती किंवा आक्षेप उपस्थित करणे अपेक्षित आहे. आमचे काम आहे त्याची नोंद घेऊन बैठकीच्या इतिवृतात त्यांचा समावेश करुन सर्व दस्तावेज म्हणजे बैठकीचे इतिवृत्त, सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त लेखी सूचना/आक्षेप यासह पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करणे. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी सुरवातीस सांगितले की ही पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती ही कुठल्याही प्रकल्पास

मान्यता देत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारस करत नाही. बैठकीचे इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर केल्यानंतर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

तरी उपस्थितांना विनंती आहे की त्यांनी जनसुनावणीचा उद्देश व संकल्पना (scope of public hearing) लक्षात घेऊन सूचना, हरकती वा आक्षेप उपस्थित करावेत. येथे सुप्रीम कोर्टाच्या निकालातील विशिष्ट परिच्छेद वाचणे, आपसात चर्चा करणे हे अपेक्षित नाही.

१८) **श्री कुंदन संखे यांनी विचारणा केली की** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ग्रामपंचायतीस पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजनाबाबत पत्र पाठविलेले आहे. त्या पत्रात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची वेळ आहे काय? जी प्रकल्प बाधित गावे आहेत, त्यांनातरी जनसुनावणी बैठकीची वेळ अगोदर कळविलेली आहे काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत सर्व जनतेसाठी जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची तारीख, बैठकीचे स्थान व वेळ सकाळी ११.०० वाजताची दिलेली आहे. मात्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ग्रामपंचायतीस पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजनाबाबत पाठविलेल्या पत्रात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची वेळ लिहिलेली नव्हती, त्यामुळे ब-याच लोकांना माहित नव्हते, या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. तरी आता दुस-या व्यक्तीस बोलण्याची संधि देण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

१९) **श्री अशोक शिंगाडा, उलगुलान ब्रिगेड अध्यक्ष, आदिवासी कार्यकर्ताः-** येते श्री अशोक शिंगाडा यांनी आक्षेप नोंदविला की जनसुनावणीची घाई कशाला करता, प्रथम ग्रामपंचायतीची संमती घेण्यात यावी, नंतरच जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. आम्ही कोणाचाही विरुध्द नाही. आधी ग्रामसभेची संमती घेण्यात यावी, नंतर कंपनीच्या मालकीच्या जागी न करता सार्वजनिक जागेत जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**२०) श्री डिमेलो यांनी** परत आक्षेप नोंदविताना मागणी केली की एडव्होकेट राहूल पाटील यांनी सादर केलेल्या पत्रातील परिच्छेद वाचण्यात यावा. जशी विराज कंपनीच्या विस्तारिकरणाची माहिती दिली, तशीच जजमेंटची माहिती उपस्थितांना देण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत विनंती करत सांगितले की आपण उपस्थित करत असलेल्या सर्व सूचना, विचार, टीकाटिप्पणी, हरकती/आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. कृपया विनंती आहे की जनसुनावणीचा उद्देश व संकल्पना (scope of public hearing) याच्या बाहेर जाऊन प्रश्न, तेचतेच मुद्दे उपस्थित करण्यात येऊ नयेत. तसेच इतरांनाही बोलण्याची संधि देण्यात यावी, वारंवार २-३ व्यक्तीच बोलत आहेत. येथे महिलावर्ग उपस्थित आहे. तर महिलांनाही बोलण्याची संधि देण्यात यावी.

२१) **श्री सुभाष चुमडा, राहणार- मान,तालुका,जिल्हा-पालघरः-**

येथे ब-याच स्थानिकांनी प्रकल्प विस्तारिकरणास विरोध व्यक्त केलेला आहे. मात्र जरी पूर्वी स्थानिकांनी प्रकल्पास विरोध व्यक्त केलेला असला तरीही नंतर प्रकल्पास मंजूरी मिळते. स्थानिकांना प्रकल्पाविषयी काहीही माहिती कळत नाही. काही पुढारी लोक आमच्या स्थानिकांची फसवणूक करुन दिशाभूल करत असतात.

तर माझी विनंती आहे की ज्या ज्या ग्रामपंचायतीमध्ये जे जे पाडे आहेत, त्या त्या पाड्यात बैठक आयोजित करण्यात यावी. जे स्थानिक आहेत, त्यांना विराज कंपनीविषयी काहीही माहिती नाही. जे लोक बैठकीत कंपनीस विरोध करतात, तेच लोक कंपनीस मंजुरी देण्यास सांगतिल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**२२) सौ. अंजली संदिप भवर, सरपंच, मान ग्रामपंचायत, मान, तालुका, जिल्हा-पालघरः-** आज आयोजित केलेली ही जनसुनावणी अत्यंत अन्यायकारक, संशयास्पद आहे. तसेच अनेक गंभीर प्रश्न निर्माण करणारी कंपनी आहे. सर्वप्रथम मी येथे अत्यंत मूलभूत मुद्दा उपस्थित करते की आपले गाव हे पेसा कायद्यांतर्गत येणारे ग्रामपंचायत क्षेत्र आहे. अशा परिस्थितीत ग्रामसभेची पूर्णपणे संमती, ना हरकत घेणे कायद्याने बंधनकारक आहे. ते न घेताही ही



VH

प्रक्रिया राबविली जात आहे. हे पेसा कायद्याचे सरळसरळ उल्लंघन केलेले आहे. त्यात आम्ही २४-०३-२०२६ ला विशेष सभा घेऊन पेसा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा विराज कंपनीच्या विस्तारिकरण करण्याचा पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सर्वानुमते रद्द करण्याचा ठराव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना दिलेला आहे. त्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. मी **मान** ग्रामपंचायत सरपंच म्हणून या प्रक्रियेचा आणि पध्दतीचा तीव्र निषेध करते.

मा. जिल्हाधिकारी ही जनसुनावणी पुढे ढकलत होत्या, पण प्रशासन नेहमी भांडवलदारांच्या बाजूने असते, हे गरिब कोण, आदिवासी कोण, हे रस्त्यावर/बाहेर उतरले की मागे हटत नाहित. पेसा कायद्याचे उद्दिष्ट सांगतात.

गावाचा कारभार हा गावाच्या तत्वाने ग्रामसभेला स्थान देते. संस्कृती, अनुसुचित समाजाच्या पारंपारिक परंपरा, संस्कृत्या आणि सामाईक संसाधनांचे संरक्षण करते. शोषणापासून मुक्ती, आदिवासींचे जमिन, जंगल, पाण्यावरिल हक्क अबाधित ठेऊन बाहेरिल हस्तक्षेप किंवा शोषण रोखले.

आता तिसरा मुददा.- पाण्यावरिल आपला हक्क ठेवला आणि विराज प्रोफाईल्सने मागील १०-१२ वर्षात दिले आहे फक्त जलप्रदूषण, प्रदूषित पाणी. आम्हांला नको जनसुनावणी आणि नको विराज.

दुसरा अत्यंत महत्वाचा मुद्दा आज कंपनीच्या मालकीच्या जागेत ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. जनतेचा आवाज ऐकण्यासाठी जनसुनावणी ही कंपनीच्या मालकीच्या जागेत होत असेल, तर ती निपक्ष कशी होणार, ही प्रक्रिया लोकशाहीविरोधी आहे. आम्ही ते मान्य करत नाही. म्हणून आम्हांला नको जनसुनावणी.

जलप्रदूषण -अनेक वर्षे येथे जलप्रदूषण होत आहे. विहिरी, बोअर दुषित होत आहेत. पूर्वी विहीरी खोदून पाणी पित असत. आता पितील का? उपस्थितांनी एकत्रित -नाही॰ असे ओरडून सांगितले.

ध्वनी प्रदूषण- आमच्या लोकांना ध्वनी प्रदूषण माहित नव्हते. पूर्वी आमच्या येथे प्राण्यांचा व पक्ष्यांचा आवाज यायचा. आता कंपनीचा आवाज येतो. सतत येणार आवाज गावक-यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करत आहे. वृध्द, लहान मुले सर्वजण त्रस्त आहेत.

सरकार सांगते आपले प्रकल्प राबवा. समृध्द गाव बनवा. आणि समृध्द गाव बनविण्यासाठी असे कारखाने असल्यास गाव समृध्द बनेल का?

वनबंधारे बांधण्यास सांगतात. विराज कंपनीचे दुषित पाणी जर गावात येते, तर तेथे वनराई बांधून चालेल का? सर्व उपस्थितांना एकत्रीत -नाही॰ असे सांगितले.

आम्ही या प्रकल्पास आणि प्रकल्प विस्तारिकरणास ठाम विरोध करत आहोत. आमचे ग्रामस्थ सांगतिल तेव्हाच जनसुनावणी ही व्हावी. तसेच ही जनसुनावणी ग्रामपंचायत कार्यालयात किंवा सार्वजनिक जागेतच घेण्यात यावी. सर्व ग्रामस्थांना त्यांचे मत निर्भयपणे मांडणे महत्वाचे असते. जनसुनावणी प्रक्रिया ही प्रशासनाच्या देखरेखेखाली असावी. जनसुनावणी प्रक्रिया योग्य वेळी व सर्वांना स्पष्टपणे दिसून यावी. ग्रामपंचायतीची ना हरकत घेणे प्रकल्पास बंधनकारक आहे.

तसेच विराज कंपनीचे दुषित पाणी सरकार पिईल का? आता आणून दाखविल्यानंतर पाणी पिऊन दाखवतील का?

लोक सांगतात की ग्रामपंचायतीसमोर कंपनीला कचरा दिसतो. हा कचरा कोण उचलणार? प्रथम कचरा हटवत नाहीत, आणि ग्रामपंचायतीस सांगतात प्रथम कचरा हटवा. कंपनीने स्वतः आपला कचरा हटवावा, मगच ग्रामपंचायतीस कचरा हटविण्यास सांगावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**२३) सौ. नीता किशोर काटकर, भूमीसेना आदिवासी एकता परिषद जिल्हा उपाध्यक्ष, माजी सरपंच, महागाव, तालुका,जिल्हा-पालघरः-**

या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस आम्ही प्रखरपणे विरोध करत आहोत. ही जनसुनावणी बेकायदेशीर असून ती रद्द झाली पाहिजे. ग्रामसभेच्या अधिकाराचे उल्लंघन करुन जर ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, तर त्यास पूर्णपणे जबाबदार विराज कंपनी आणि जिल्हाप्रशासन आहे.

शासनास मला एकच प्रश्न विचारायचा आहे - आपण जनतेसोबत आहात का विराज कंपनीच्या सोबत आहात? आमच्या पालघर जिल्ह्यात एवढे प्रकल्प आले, आमच्या सर्व जमिनी जबरदस्तीने घेतल्या, प्रकल्प आमच्यावर लादण्यात आलेले आहेत. जनतेस द्यायला वेळ नाही, तर विराज कंपनीसाठी का बसलेले आहात?

शासकीय अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत. आपण वर्ग-१ चे अधिकारी आहात, तर आपण आम्हांला नियम शिकविले पाहिजे. आम्ही कमी शिकलेलो आहोत, आम्हांला माहित आहे की आमच्यावर कसा अन्याय होतो, तुम्ही सरळ पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेच्या कायद्याचे उल्लंघन करत आहात. पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. येथे पेसा ग्रामपंचायती आहेत. या पेसा ग्रामपंचायती क्षेत्रात आमचा अधिकार आहे. या जमिनीवर, पाण्यावर आमचा अधिकार आहे. तुम्ही कोण आहात तर बिसलेरी घेऊन पाणी पितील, आम्ही स्थानिक कुठुन पाणी पिणार? आम्हांला बिसलेरी पाणी परवडणार आहे काय, याचे उत्तर आपण दिले पाहिजे.

तुम्ही म्हणता विकास, तर तुमच्या कंपनीत आमची शेती होणार आहे काय? भात पिकणार आहे का-नाही, त्याला जमिनच लागणार आहे. आमच्या येथील जमीन आपण दुषित केलेली आहे.

येथे एक कार्यकर्ता आहे. त्याने गेल्या वर्षी भात लावला. भात आला व त्याला केमिकल्सचा उग्र वास येत होता. तर तुम्ही त्याची भरपाई करणार का? येते कंपनी विकास करण्यासाठी नाही, तर अन्याय करण्यासाठी आलेला आहेत?

ही लढाई आमची शेवटपर्यंत अशीच राहील. शासनास एकच सांगायचे आहे की आपण जनतेच्या बाजूनेच राहावे. आमच्या किमान गरजा या अन्न, वस्त्र व निवारा याच आहेत. त्यावर हातोडा मारत असतील, तर कदापीही आम्ही सहन करणार नाही. निसर्ग आमचा देव आहे, आम्ही निसर्गाला मानणारे आहोत. निसर्गावरच हातोडा माराल, तर ते कदापीही सहन आम्ही करणार नाहीत. यापेक्षा जास्त तीव्र आंदोलन होईल. विराज कंपनीची एकही गाडी आत आणि बाहेर जाऊ देणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२४) **श्री संजय पाटील, शिवशक्ती सामाजिक संघटना, बोईसरः-**

आजची जनसुनावणी ही पेसा कायद्याचा आणि आदिवासी समाजाचा अपमान आहे. जर ग्रामसभेला अधिकार दिलेले आहेत, तर त्याचा सन्मान करण्यास शिका. दरवेळी ग्रामसभा घ्या, ठराव घ्या असे सांगितले जाते. जर ठरावाला किंमत द्याचीच नाही, तर ग्रामसभा घ्यायचीच कशाला?

आज विराजचा इतिहास बघितला तर मी त्याच्याविरुध्द लढलेलो आहे. प्रकल्पा दंड झाला तो फक्त २०,०००/- किंवा २५,०००/-. आज येथील एमआयडीसी पश्चिम पट्टयात आहे. तेथील पाणी व हवा पुर्णपणे खराब झालेले आहे. लोकांना राहणे मुश्किल झालेले आहे.

आता हा जो पूर्व पट्टा आहे, तो लोकांच्या राहण्यासाठी, लोकांच्या हितासाठी जपला गेला पाहिजे अशी माझी शासनास विनंती आहे. पुर्वपट्टयाला दुसरा प्रकल्प आला, तर लोकांनी राहयचे, जगायचे कसे काय?

स्थानिकांचा अनुभव आहे की हवा प्रदूषणात विराज सर्वात जास्त प्रदूषणकारी आहे. जलप्रदूषणात विराज सर्वात जास्त प्रदूषणकारी आहे. येथील कालव्यात विराज कंपनीतील केमिकलयुक्त सांडपाणी मिसळत असते. या परिसरातील अनेक विहीरी व बोअर्स हे प्रदूषित झालेले आहेत. येथील स्थानिकांना प्रदूषित पाणी प्यावे लागत आहे, कारण सगळेच बिसलेरीचे पाणी पिऊ शकत नाही.

मी प्रकल्प प्रवर्तक विराजलाही विनंती करतो की त्यांनी असे प्रदूषित प्रकल्प येथे आणू नयेत. हा पूर्वेकडील पट्टा हा हरितपट्टा राहण्याचा भाग आहे. येथे आदिवासी, कुणबी बांधव शेती करतात. शेती नष्ट होऊ नये, म्हणून हा विस्तारिकरण प्रकल्प रद्द करण्यात यावा. ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. जनसुनावणी जेथे प्रकल्प कार्यान्वित होणार आहे, तेथे आयोजित करु नये, कारण ती निर्विघ्नपणे पार पडली पाहिजे. बैठकीत असे दिसून येत आहे की प्रशासन हे विराज प्रकल्पास पाठिशी घालत आहे आणि जनसुनावणी ही फार्स आहे. मी विनंती करतो की बोईसरच्या पूर्व पट्टयाला असे प्रकल्प येऊ नयेत. तरच आदिवासी, कुणबी माणूस, गरीब माणूस शेती करून येथे राहिल. तरी या प्रकल्पाचा व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीचा मी निषेध करतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२५) **श्री प्रशांत प्रभाकर पाटील, राहणार-पडघे गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

या **मान**लगत त्याच्याच अक्षांशावर (latitude) गाव आहे, पडघे. ते आपण विसरुन गेलात. बाजूचे गाव माझे आहे आणि आमचा आरोप आहे की पहिल्या प्रकल्पासाठी ४०० केएलडी पाणी हे प्रकल्प प्रवर्तकांनी माझ्या गावाचे चोरलेले आहे, हा आमच्या गावाचा आरोप नेहमी असतो, म्हणून तुम्ही आम्हांला विसरला असाल.



VH

तरी मी विराज कंपनीच्या व्यवस्थापनास विनंती करतो की तुमचे आकडे मी सादरीकरणात पाहिले आणि फक्त ०.४ एमएलडी पाणी तुम्ही कोठून आणतात, या प्रश्नाचे उत्तर आजही मिळालेले नाही.

याच्या पुढे तुम्हाला जे पाणी लागणार आहे, ते ४.० एमएलडी पाणी आहे, तर मा. जिल्हाधिकारीसाहेब तथा मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती या पडघे अधिक १९ गावे पाणीपुरवठा योजनेत मला ४.० एमएलडी पाणी आवश्यक होते, तर आपण पाणी नाही असा अहवाल दिला, मग विराज यांनी काय दिले की त्यांनी मागितले तर त्यांना ४.० एमएलडी पाणी मिळेल, याचे उत्तर प्रशासनाकडून आम्हांला पाहिजे.

पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल आपण जो सादरीकरणात दाखविला, तो अहवाल एक वर्ष अगोदरचा असला पाहिजे. त्या अह्वालात आपण पाण्याचे नमुने, हवेचे नमुने, ध्वनीचे नमुने जे गोळा करण्यात येतात, त्याची methodology काय हे आपल्याला माहित नाही. मी गंभीर आरोप करतो की ज्यांनी अहवाल बनविला, हीच कंपनी रजिस्टर नाही, जर ज्या अहवालावर आपण ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे, तो किती बेकायदेशीर आहे, किती लोकशाहीला धरुन आहे, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. येथे स्थानिक डेटा, स्थानिक लोकांच्या मुलाखती या अहवालात असणे आवश्यक होते. ते कुठेही दिसत नाही.

जर ०.४ एमएलडी पाण्याचे उत्तर मिळत नाही, तर ४.० एमएलडी पाण्याचे उत्तर कंपनी देणार कशी? ०.४ एमएलडी पाणी जेव्हा बाहेर पडते, तेव्हा जो बारीपाडा आहे, तेथे आतमध्ये घातलेला पाईप काय करतो याचे उत्तर लागेल. विराज कंपनीच्या ९.० एकर क्षेत्रात आतमध्ये किती बोअरिंग खोदलेले आहेत, त्यात किती सांडपाणी आत जाते, त्याचीही माहिती आम्हांला पाहिजे आहे. त्याचवेळी हे ४.० एमएलडी पाणी बाहेर निघेल, तर माझ्या पडघा सुजलाम, सुफलाम गावाचे, पडघागावातील, **मान** गावातील शेतींचे नुकसान करणार आहात हे आपल्या निदर्शनास आणावे लागत आहे. आपण पाहिले तर चांगले जंगल, विविधतेने नटलेल्या वनस्पती, संरक्षित वनस्पती व प्राणी यांचे काय करणार याचे उत्तर अहवालात नाही. जर विराज कंपनी जल, हवा, ध्वनी व येथे राहणार माणसे यांचा विचार करत नाही, तर विराज कंपनी जंगलातील लहान प्राण्यांचा विचार कशाला करेल?

जरी विराज कंपनीने येथे बैठकीत सुंदर आश्वासने दिलेली असली तरीही १९९५ साली स्थापन झालेल्या या कंपनीने पालघर परिसराचा फक्त आणि फक्त वापर करण्यात आला

कंपनीच्या स्वार्थाकरिता आणि आमचा सत्यनाश करण्यासाठी वापर करण्यात आला याचा मी निषेध करतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२६) **श्री सचिन रमेश लोखंडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, ठाणे-पालघर प्रदेशाध्यक्ष युवक आघाडीः-** माझे हे स्पष्ट मत आहे की हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे बरखास्त केले पाहिजे, कारण असे भ्रष्टाचारी मंडळ आम्ही आजपर्यंत पाहिलेले नाही. पालघर पश्चिमेचा पुर्ण पट्टा दुषित केला आणि आता पूर्वेकडील सर्व पट्टा दुषित करणार आहात काय? तर आता जनमानसांची भावना राखावी हीच आमची मागणी आहे. पेसा ग्रामपंचायतीचा निर्णय ग्राह्य धरत नाही, आज आमच्या आदिवासी समाजाला गृहित धरत नाहीत, जर प्रशासन तसे वागत असेल, तर या बोईसर विभागाचे काय होईल. असेच जर हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राहिले तर या भागाचे पूर्णपणे विस्थापन झाल्याशिवाय राहणार नाही. येथील एकही नागरिक हा आरोग्यसंपन्न, शैक्षणिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या संपन्न राहिल. येथील नागरिक हा संपुर्ण नेस्तनाबूत झालेला असेल.

तरी येथे विस्तारिकरण प्रकल्प राबवू नये ही आमची प्रमुख मागणी असेल.

मा. जिल्हाधिकारी यांना आमचे एकच मागणे आहे की संविधानमान्य पेसा ग्रामपंचायतीने जो निर्णय दिलेला होता, तो आपण जनसुनावणीत वाचून दाखवायला हवा होता. तो वाचून दाखविला नाही, त्याबद्दल आम्ही तुमचा जाहिर निषेध करतो.

दुसरी गोष्ट याठिकाणी कुठलेही सीईटीपी चे नियोजन नाही. त्यामुळे येथील प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी ब-याच प्रमाणात जमीनीतच मुरते. तसेच प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुढे त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबतचे स्पष्टीकरण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेले नाही. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर शासकीय प्रशासनाने कारवाई करावी. राज्यघटनेनुसार पारित केलेला पेसा कायदा व त्यानुसार सुप्रीम कोर्टाने दिलेला निकाल/ जजमेंट जर जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पाळत नसेल तर सामान्य माणसाने जायचे कुठे?

तरी जरी आपण ही जनसुनावणी दडपशाहीने पुढे चालू ठेवली, तरीही हे आंदोलन थांबणार नाही. आम्ही रस्त्यावर उतरुन हे आंदोलन करु, कायदेशीररित्या ते पुढे नेण्यात येईल. तरी प्रशासनाने याची दखल घ्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२७) **श्री अशोक वढे, माजी कृषि सभापती, भारतीय जनता पार्टी, जिल्हा सरचिटणीसः-**

बैठकीत ब-याच उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या सूचना, हरकती/ आक्षेप उपस्थित केलेल्या आहेत. माझी प्रशासनास विनंती आहे की पेसा कायद्यांतर्गत येथील ग्रामपंचायत क्षेत्र आहे. पण जर पेसा कायदा मानत नसाल, तर त्या पेसा कायद्याचा उपयोग काय?

ही जनसुनावणी बेकायदेशीर असून ती अनैतिकपणे, जबरदस्तीने जनसुनावणी घेण्यात येत आहे. एडव्होकेट राहूल पाटीस यांनी सादर केलेले सुप्रीम कोर्ट जजमेंट येथे बैठकीत वाचणे अपेक्षित होते. येथे उपस्थित असलेल्या सर्वांचे म्हणणे आहे की जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२८) **श्री पवनकुमार सारडा, राहणार-श्रीनिवास पार्क, मान गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

२००९ ला आम्ही जेव्हा येथे राहण्यास आलो, त्यावेळी असे वाटत होते की आम्ही निसर्गाच्या कुशीत राहण्यास आलो. येथील निसर्गसौदर्य छान होते. जेव्हा त्यावेळी पाण्याचे पृथ्थकरण करण्यात आले, त्यावेळी Hardness - १७५ - २२५ येत असे मे महिन्यात. १७५ येत असे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये. पावसाळ्यात तर हार्डनेस कमी असे. आमच्या येथून नाला जातो, त्यावेळी तेथे Hardness असे ६० - ६५, क्लोराईड ४०-४५.

आता जर पृथ्थकरण केले, तर ९०० पेक्षा जास्त हार्डनेस असतो. आणि १४३५ पीपीएम जातो. त्यात टीडीएस आणि क्लोराईड हे ५५० पेक्षा जास्त असतो, जो आरोग्याला घातक आहे.

VH

जेव्हापासून ही कंपनी सुरु झाली, तेव्हापासून आमच्या शेजारील नाल्यातून डार्क ब्राऊन रंगाचे सांडपाणी सोडण्यात येते. ते डार्क ब्राऊन रंगाचे सांडपाणी कंपनीच्या पिकलिंग प्रकल्पातून सोडण्यात येते, ज्यात हायड्रो-क्लोरिक एसिड व इतर घातक रसायने असतात. म्हणून आमचे बोअर वेलचे पाणीही खराब झालेले आहे. आम्हांला खराब पाणी प्यावे लागते. मी तेथील पाण्याचा नमुना सुध्दा घेऊन आलो होतो, कोणी पाणी पियेल का? मात्र पोलिसांनी ते आत नेण्यास मनाई केली. पाणी एवढे खराब झालेले आहे की आयएसओ मानकांनुसार ते पिण्यायोग्य राहिलेले नाही.

सादरीकरणात दर्शविल्यानुसार क्लॅशियमचे मानक दर्शविलेले आहे २०० पीपीएम. २०० पीपीएम हार्डनेसमध्ये रुपांतर केल्यास ते होते ५०० पीपीएम. मॅगनेशियम हार्डनेस १००० पीपीएम पर्यंत जाईल. Water Treatment Hand Book नुसार साधारणपणे पिण्याच्या पाण्याचे मानके २२५ हार्डनेस लागते. त्यावरिल पिण्यास योग्य नाही.

हार्डनेस २२५ पेक्षा जास्त झाल्यास ते पिण्यायोग्य पाणी राहत नाही. तसेच ते पाणी टाकल्याने फळेफुले येत नाहीत.

विस्तारिकरणामुळे प्रकल्पातून जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

२९) <u>**रेश्मा जगताप, स्थानिक भूमीकन्या - गुंदले -**</u>

वास्तविक पहाता ४ तारखेस इशारा दिला होता, त्यावेळेसच जनसुनावणी ही रद्द होणे अपेक्षित होते. तरीही आपण ही जनसुनावणी आयोजित केली आहे. आपण दरवेळी सांगत आहात की आपले बोलणे हे रेकॉर्ड करत आहोत, तर हे मुद्दे आपण रेकॉर्ड करावेत-

तुम्ही आमच्या माताभगिनींना विचारा, कंपनीच्या जलप्रदूषणामुळे पर्यावरणाला आपण जो धोका निर्माण केलेला आहे, त्यामुळे येथील किती माताबहिणींनी आपल्या लहान लहान मुलांना गमावले?

कंपनीच्या ओव्हरलोडच्या गाड्यांच्या अपघाताने येथे जमलेल्या किती माताभगीनींनी त्यांच्या भावांना, मुलांना गमावले? हे प्रश्न आपण त्यांना विचारा. ते फक्त येथे वेळ

घालविण्यासाठी आलेले नाहीत. येथे स्थानिकांनी शुध्द पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. त्यांना शुध्द हवा ही मिळाली पाहिजे. त्यांचा तो अधिकार आहे. येथे आलेल्या एक एक महिलांना विचारा त्यांना कंपनीपासून काय त्रास होत आहे?

ही जनसुनावणी आयोजनासाठी आमचा विरोध होताच. आपण जो प्रकल्प विस्तारिकरण करत आहेत, त्यास आमचा विरोध आहे. जर प्रकल्प सुरु करण्याचा प्रयत्न केला, तर स्थानिक असा प्रचंड विरोध करतील की तसा विरोध तुम्ही बघितला नसेल. कंपनी जोपर्यंत काम थांबवत नाही, तोपर्यंत हे आंदोलन चालून राहिल.

उपस्थितांनी जनसुनावणी रद्द करण्याच्या एकत्रित घोषणा केल्या.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३०) **श्री प्रभाकर पाटील, अध्यक्ष, बहुजन विकास आघाडी, पालघर तालुकाः-**

खरोखरच मी सांगू इच्छितो की छोटे घर बांधायचे असले तरी ग्रामपंचायतीच्या परवानगीशिवाय घर बांधून देत नाही. तर एवढ्या मोठ्या कंपनीचे विस्तारीकरण करताना जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी कंपनीस सांगणे आवश्यक होते की **मान** ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र प्रथम सादर करा, नंतरच विस्तारिकरणाची पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येईल. मात्र आपण असे काहीही न करता ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित केलेली आहे. हे अन्यायकारक आहे. तरी बहुजन विकास आघाडी, पालघर तालुका व मी वैयक्तीक या जनसुनावणी आयोजित करण्याचा निषेध करतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३१) **डॉ. योगेश सुभाष बन, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जिल्हा उपाध्यक्षः-**

येथे सर्व वक्त्यांनी, वरिष्ठांनी चांगले मुद्दे मांडले आहेत. सर्व मुद्द्यांमधून एकच लक्षात येते की पेसा कायद्यांतर्गत असलेल्या ग्रामपंचायतीने प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास परवानगी दिलेली नाही. येथे आपण पेसा कायद्यांतर्गत असलेल्या ग्रामपंचायतीच्या विरोधी काम करत आहे हे दिसून आले. हे नियम फक्त सामान्य माणसासाठीच का, विराज कंपनीस का नाहित? त्याऐवजी शासनाने दुसरे नियम बनविलेले आहेत काय?

आपण असाच अत्याचार करणार असतील, तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा आम्हांला काय फायदा? असा काय साटेलोटे झाले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विराजवर कारवाई करत नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सर्व फाईल आहे. आमच्या कडे सर्व १५०-२०० केसेस आहेत, त्यावर पेपर वर्क करुन ते जिल्हाधिकारी, पालघर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेले आहेत. श्री अमोल गर्जे सारख्या सामाजिक कार्यकर्त्याने सर्व माहिती आपणास सादर केलेली आहे.

या जनसुनावणीचा आम्ही निषेध करत आहोत. बैठकीत उपस्थित ताईंने सांगितले आम्ही विराजची एकही गाडी कंपनीत व कंपनीबाहेर जाऊन देणार नाही. राष्ट्रवादी पक्ष हा जनतेबरोबरच आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३२) **श्री विश्वनाथ महादेव रिंजड, बारीपाडा, विराज कंपनीच्या पाठीमागे राहतोः-**

विराज कंपनी बोलते प्रदूषण नाही. जर प्रदूषण नाही, तर बारीपाडाला त्रास कुठला होतो? माझ्याकडे कंपनीपासून होणा-या प्रदूषणाचे व्हिडिओ आहेत, ते सर्वाना दाखवितो. जर विराज कंपनी म्हणते त्यांच्या पासून प्रदूषण होत नाही, तर हा व्हिडिओ बघा. त्यांनी व्हिडिओ दाखवला. विराजच्या विरुध्द कोणी बोलले तर पाणी बंद करुन टाकतात. तर हा कारखाना बंद करा.

सर्वांनी एकत्रित जनसुनावणी बंद करा ही घोषणा केली.

त्यावेळी उपस्थितानी सामान्य माणसाची भावना लक्षात घेऊन हा प्रकल्प रद्द झालाच पाहिजे हे मत मांडले.

**श्री विश्वनाथ महादेव रिंजड, बारीपाडा** यांनी आरोप केला की रात्री कंपनी नाल्याला पाणी सोडतात. आता पाईपमधून नाल्यात पाणी सोडतात. त्यामुळे नाला पाण्याने भरतो व त्यामुळे मुलांना शाळेत जाताना त्रास होतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३३) **सौ. भावना सुधीर विचारे, माजी जिल्हा परिषद सदस्य, पालघरः-**

ग्रेथे कुठल्याही पक्षाची नाही तर स्थानिकांची भूमिका व्यक्त करण्यासाठी उभे आहेत. प्रत्येकाने आपले मत व्यक्त केलेले आहे. मी आपणास निदर्शनास आणू देऊ इच्छिते की बोईसर पश्चिमेस एमआयडीसीसाठी जमिनी दिलेल्या आहेत. तेथे विकासासाठी कधीच स्थानिक भूमीपुत्र विरोधात नव्हते. त्यामुळेच हा विकास होऊ शकलेला आहे. तेथील लोक जेव्हा प्रदूषणाला कंटाळून ते पूर्वेला यावे लागत आहे. स्थानिकांना आपली घरे सोडून येथे यावे लागत आहे. तर येथेही आपण तीच भूमिका घेणार असाल, तर स्थानिकांनी जायचे कोठे? मग ही कार्यालये उघडून काय उपयोग आहे? जेव्हा स्थानिकांची तळमळ लक्षात न घेता फक्त एकच मुद्दा उपस्थित करत आहेत की वेळ वाया घालवू नका, तर येथे एवढे उपस्थित आहेत, तर त्यांचा वेळ जात नाही म्हणून उपस्थित आहेत काय? लोकांच्या भावना लक्षात घेऊन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी नीट वकतव्य करणे गरजेचे आहे.

आम्ही आपल्या अधिकाराचा निश्चितपणे आदर करत आहोत. मात्र आमचा जनआक्रोश लक्षात घेता ही जनसुनावणी येथे आम्ही तीव्र घोषणा देत आहोत, तरीही आपणास आपले सादरीकरण महत्वाचे वाटत आहे. तुम्हाला एकदाही असे वाटत नाही की स्थानिकांच्या काय भावना आहेत, तर प्रथम स्थानिकांना मान देऊ या. ही जनसुनावणी तुम्ही तुमच्या पध्दतीने घेत आहेत. तरी हे उपस्थित मुद्दे पुढे घेणे महत्वाचे आहे. आम्ही स्थानिक राहणार कोठे? पालघर पश्चिमेला आपण बघा, संध्याकाळी सहानंतर, आम्ही फक्त विराज कंपनीसच दोष देत नाही. तर प्रदूषण करणा-या सर्व कंपन्यावर लक्ष ठेवणे हे तुमच्या अधिका-याची जबाबदारी आहे. मात्र आपण या गोष्टींवर लक्ष देत नाहित. आम्ही दिलेली पत्रे आपण घेता व नुसती पोच देता, नंतर ती कुठे जातात?

या सर्व गोष्टींचा तीव्र निषेध आम्ही याच्यासाठीच करतो की आम्हालाही सुसह्य आणि आमच्या येणा-या पिढीला आयुष्य लाभावे.

तुम्ही प्रकल्प आणा. आमचा विरोध कुठल्याही गोष्टीस नव्हता. पण अशा पध्दतीची जी जबरदस्ती करुन जी जनसुनावणी घेता हे खूप चुकीचे आहे.

जेव्हा तुम्ही ग्रामसभेला, ग्रामपंचायतीला लक्षात न घेता तुम्ही तुमची मनमानी करता, तर या पध्दतीने तुम्ही आभार मानायला पाहिजे की स्थानीकांनी कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार केलेला नाही. तुमच्या सर्व शब्दाला मान दिलेला आहे.

खरोखर तुम्हाला पुनश्च विनंती करते ज्या पध्दतीने हे प्रदूषण वाढत चाललेले आहे, तर तुम्हीदेखील येथेच राहता. तर तुमची पण येणारी पिढी आहे.

जेव्हा पालघरसाठी प्रत्येक अधिकारी हा धडपड करुन येतो, का तर येथे विकासात्मक प्रकल्प येणार आहेत. त्यासाठी तुम्ही येथे येता आणि आम्हांला प्रदूषणात टाकतात. तरी या गोष्टीची आपण गंभीर दखल घ्यावी की येणा-या प्रकल्पाबाबत सर्वांनी सांगितले की पाण्यासाठी आपण काय उपाययोजना करणार आहात, जे ध्वनी प्रदूषण होत आहे, येथे रात्री येऊन पहा शांततेने झोप येथील स्थानिकांना लागत नाही. कारण स्टील प्रकल्पामुळे सतत आवाज येत असतो. त्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत चालले आहे. य़ेथे आमच्या एका भगिनिने सांगितले की विराज किंवा इतर कंपनीचे जे ट्रक्स भरधाव धावत जातात आणि जागच्या जागी मुलांचा जीव जातो. त्यांना लाख-दोन लाख रुपये भरपाई देऊन त्यांची मुले, त्यांचे सौभाग्य परत येणार आहे काय? या गोष्टींमुळेच सर्वांचाच या जनसुनावणीस विरोध आहे.

येथे जे प्रकल्प आणतात, त्याच्यात प्रथमतः स्थानिकांचे जबाबदारीने विचारपूर्वक विचार करावा. जे होणारे प्रदूषण आहे, त्यावर आपण काय उपाय योजना करणार आहात, त्याची तुम्ही ठाम भूमिका सांगा. जनसुनावणीतच आपण आपले मत मांडत नाहीत. तुम्हाल जेव्हा विचारले जाते उत्तर द्या, तर कुठल्याही प्रकारचे उत्तर देत नाहीत. आपण तुम्ही बोला म्हणता व तुम्ही ऐकून न ऐकल्यासारखे आहे. येथे जे काही करत आहात, ते चुकीच्या पध्दतीने चालले आहे. माता भगिनींच्या भावना लक्षात घ्या. पुन्हा पुन्हा आम्ही सांगतो की विकासासाठी आमचा कधिच विरोध नाही. होणारे प्रदूषण, ज्या पध्दतीने जी मनमानी आहे ती कुठेतरी थांबली पाहिजे.

सगळ्या स्थानिकांना आणि अधिकारी येणा-या प्रकल्पांसाठी जो कोणता प्रकल्प आहे, त्यासाठी एक समिती गठित करण्यात यावी. त्यांना विश्वासात घ्या. ही मनमानी ही थांबविलीच पाहिजे. जनसुनावणी कुठेही होऊ द्या, सगळ्या आम्ही स्थानिक कन्या आणि भूमीपुत्र एकत्र आहोत हे आम्ही तुम्हांला अगदी ठामपणे सांगतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३४) **श्री दत्ता सांबरे, आदिवासी एकता परिषद भूमीसेना संघटनेचा पालघर जिल्हाध्यक्षः-** येथे पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकारी आहेत त्यांनी काही न सांगता जमलेल्या माझ्या बंधू भगिनींना सांगू इच्छितो की महाराष्ट्र



VH

प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी जे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेत आहेत, ही जनसुनावणी पूर्णपणे बेकायदेशीर आहे. आपल्या पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेने ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी रद्द करा असा ठराव मंजूर करुनसुध्दा ग्रामसभेला न जुमानता आज जे अधिकारी जनसुनावणी घेत आहेत, हे आंधळे, बहिरे आणि मुके आहेत. हे जनतेचे वाली नाहीत. तर हे विराज कंपनीचे वाली आहेत. विराज कंपनीसाठी येथे येऊन बसलेले आहेत. अशा लोकांचा मी जाहिर निषेध करतो आणि ग्रामसभेच्या अध्यक्षांना मी जाहिर आवाहन करेन की अशी अधिका-यांच्या विरोधात एक ग्रामसभा आयोजित करण्यात यावी आणि यांच्यावर गुन्हे नोंदविण्यासाठी पोलिस स्टेशनला पत्र देण्यात यावे.

त्याचप्रमाणे जे आदिवासी बांधव आहेत, ज्या लोकांचे पिण्याचे पाणी विराज कंपनीने जाणूनबूजून खराब केलेले आहे, अशा विराज कंपनीच्या व्यवस्थापनावर Atrocity Act अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात यावा. मात्र ते तुम्ही केले पाहिजे. कारण जोपर्यंत अन्याय सहन करणार, तोपर्यत हे लोक आपल्यावर अन्याय करत राहतील.

आज येथे पोलिस प्रशासन मोठ्या प्रमाणात आहे. मी त्यांना जाहिरपणे सांगू इच्छितो की माझे जे आदिवासी बांधव आहेत, जे सर्व धर्माचे जातीबांधव आहेत, त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देताना त्यांनाही अशाच प्रकारचे संरक्षण देण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३५) **श्री.संतोष कवळे, माजी ग्रामपंचायत सदस्य, गुंदले, राहणार-बारीपाडा, तालुका, जिल्हा- पालघरः**-कंपनीने व्यवस्थापनाने आम्हांला आमिष दाखवून विविध कामे, सवलती देऊ असे सांगितले. मात्र त्यांनी काहीही केलेले नाही.

आमचा बारीपाडा पंधरा वर्षांपूर्वी स्वर्ग होता. त्या स्वर्गाची नरकापेक्षा वाईट स्थिती या विराज कंपनीने केलेली आहे.

त्यांनी कॅमेरामनला शुटिंग घेण्यास सांगितले आणि कंपनीच्या प्रदूषणाचा व्हिडिओ सर्वांना दाखविला.

श्री संतोष कवळे यांनी आक्षेप नोंदविला की आमच्या बारीपाड्याचे पाणी एवढे खराब केलेले आहे की सांगायलाच नको. आमच्या विहिरींचे, बोअर विहिरींचे पाणी बघा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३६) **<u>श्री रोहन पाटील, ग्रामस्थ गुंदले, भारतीय जनता पक्ष उपाध्यक्ष, पालघर पुर्व मंडलः-</u>**

ही जनसुनावणी ना भारताचे संविधान, ना सुप्रीम कोर्ट, ना पेसा कायदाचे निर्देश हे काहीच मानत नाही. मग ही जनसुनावणी कशासाठी आयोजित करण्यात आलेली आहे? जर येथे आलेल्या ग्रामस्थांचे प्रश्नच ऐकत नसतील, आणि त्याची उत्तरेच देत नसतील, तर या जनसुनावणीचा काय फायदा? आज माझ्या गुंदले येथील बारीपाड्यात, पिण्यायोग्य पाणीच नाही. बारीपाड्याला पाणी पुर्णपणे एमआयडीसी पुरवत आहे. बारीपाडयाची आजची अवस्था अशी आहे तो पूर्वी स्वर्गच होता. या बारीपाड्च्या बाजूला तीनशे मीटर अंतरावर आसवली किल्ला आहे. किल्ल्याची ओळख तर समृध्द जंगल असा किल्ला आहे. विराजच्या प्रदूषणामुळे त्या किल्ल्याची, माणसांची काय अवस्था झालेली आहे ते पहाणे आवश्यक आहे.

या विराज कंपनीमुळे कित्येकांचे हरितपट्टा पूर्णपणे नष्ट झालेले आहेत. विराज प्रकल्पात जे कामगार कार्यरत आहेत, त्यात स्थानिकांना प्राधान्य दिले का हे प्रथम तपासा. २०१२ ला जी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी झाली, त्यावेळी मोठमोठी आश्वासने देण्यात आलेली होती, भूमीपुत्रांना रोजगाराची संधि मिळेल, येथील परिसर आहे त्यापेक्षा सुंदर विकसित करण्यात येईल, स्थानिकांना शैक्षणिक क्षेत्रात संधि प्राप्त होतील.

मात्र तसे काहीही झालेले नाही. येथील स्थानिक शेतक-यांच्या हक्काचे शेतीचे पाणी हे अवैधपणे कारखान्यासाठी वापरले जात आहे. बैठकीत मान्यवर उपस्थितांनी अनेक प्रश्न, आक्षेप उपस्थित केले, मात्र कोणतेही उत्तर मिळालेले नाही. तरी स्थानिकांच्या व्यथा शासनास कळवाव्यात व येथील विराज कंपनी विस्तारिकरण त्वरित रद्द करण्यात यावेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३७) **<u>श्री धीरज गावंड, उपसरपंच, नांदगाव तर्फे तारापूर, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

आज येथे विराज प्रोफाईल्सची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जी आयोजित करण्यात आलेली आहे, त्याचा मी निषेध करतो. येथे आपल्या निदर्शनास आले असेल येथे पालघर जिल्ह्यातील विविध सामाजीक स्तरातील, विविध राजकीय पक्षातील, विविध विचारांचे सर्व लोक एकत्र येऊन प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपला आक्रोश नोंदविण्यासाठी



VH

जमलेले आहेत. येथे प्रकल्पाचे तांत्रिक मुद्दे बोलणे महत्वाचे आहे, भावनिक बोलून चालणार नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी जो कार्यकारी सारांश उपलब्ध करुन दिलेला आहे, त्यात त्यानी असे प्रतिपादन केले की मागच्या पाच वर्षात अठरा कोटीचा सीएसआर निधी स्थानीक गावांमध्ये खर्च केलेला आहे. त्यांनी सादरीकरण दाखविलेले आहे. ग्रामपंचायतीची भिंत रंगून दिली, महिलाबचत गटाचे कार्यक्रम करुन दिले, हळदीकुंकु कार्यक्रम केले, शिलाई मशिन्सचे कार्यक्रम केले, त्यासाठी अठरा कोटी रुपये खर्च करण्यात आले काय?

पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा आहे, ही संस्कृत्ती जगात पोहचविली पाहिजे. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी रशियन सांस्कृत्तिक कार्यक्रम केले, याचा निषेध स्थानिक लोक करत आहेत.

ही कंपनी Critically Polluted Area (CP Area) जवळ आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्र हे Most Polluted Area म्हणून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने घोषित केलेले आहे. जर पाच कि.मी. परिघात Critically Polluted Area (CP Area) आहे, जर रेड संवर्गातील फार मोठ्या प्रमाणात प्रदूषण करणारी कंपनी असेल, तर विराज कंपनीला हरित लवादाचा दिनांक १९-०८-२०१९ च्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार विराज कंपनीकडून येथे ते पाळण्यात आलेले नाहीत. प्रकल्प प्रवर्तकांनी त्याच्या ड्राफ्ट ईआयए मध्ये दिलेले उपाययोजना अपु-या आहेत.

तर येथे अस्तित्वात असलेला सीईटीपीची क्षमता कमी पडत आहे. मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, खाडीत प्रदूषणामुळे मासे मरत असतात. येथे हा परिसर मोठ्या प्रमाणात प्रदूषित आहे हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सांगत असते. तरी या विस्तारिकरण प्रकल्पास परवानगी देणे चुकीचे आहे.

प्रकल्पात पिकलिंगसाठी विविध घातक रसायने वापरली जाणार आहेत. त्यामुळे ज्या fumes - धूर निघेल - जो बारीवाडा स्वर्ग होता, तो आता प्रदूषणामुळे कसा झाला उध्वस्त झालेला आहे, हे आपण पाहिले आहे. तशी परिस्थिती येथेही होणार आहे.

हा ईआयए अहवाल पुर्णपणे दिशाभूल करणारा, अपुरा असून कायदेशीररित्या अमान्य आहे, म्हणून ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही बेकायदेशीर असून ती रद्द करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक जर सांगत असतील की त्यांनी हरितपट्टा विकसित केला, तर ते चुकीचे आहे. त्यांना झाडे लावली नाहीत, तर झाडे मारली आहेत. त्यांचे बजेट तीन वर्षासाठी दहा कोटीचे आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेला अहवाल अपुरा, खोट्या पध्दतीने केलेला, दिशाभूल करणारा आहे, म्हणून ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

पुढील मुद्दा - झेडएलडी - प्रकल्प प्रवर्तक येथील जे स्थानिकांचे पाणी वापरुन प्रदूषित पाणी सोडतात, त्यामुळे येथील परिसर हा पूर्णपणे दुषित झालेला आहे. विस्तारिकरणासाठी ४.० लाख लिटर रोज पाणी वापरणार आहेत. तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पष्टीकरण द्यावे की अशी कोणती टेकनॉलीजी आहे की ४.० लाख लिटर पाणी शुध्द करणार आहेत. प्रकल्पात अल्कलाईन वॉटर तयार होईल, तर ते कुठल्या प्रकारे शुध्द करणार आहेत. ते अशक्य आहे. प्रकल्प प्रवर्तकांचा हा अहवाल खोटा आहे. म्हणून ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

पुढील आक्षेप- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील बेसलाईन सर्वेक्षण हे फक्त तीन महिन्याचे आहे. मात्र ईआयए अधिसूचना, २००६ अनुसार सर्व ऋतूत म्हणजे पावसाळा, हिवाळा व उन्हाळा पर्यावरणातील सर्व घटकांचे शास्त्रीयदृष्ट्या सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. मात्र पर्यावरण सल्लागार यांनी फक्त तीन महिन्याचे सर्वेक्षण केलेले आहे. तरी चुकीचा ईआयए तयार केलेला असून चुकीच्या अहवालावर आयोजित करण्यात आलेली जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी.

त्यांनी आक्षेप नोंदविला की ईआयए अधिसूचनेच्या एपेन्डिक्स ४ नुसार प्रकल्पाजवळ सार्वजनिक ठिकाणी म्हणजे शाळा, मैदान, ग्रामपंचायत सभागृह येथे जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे. कंपनीच्या मालकीच्या जागेत/आवारात जनसुनावणी आयोजित केल्यास गावक-यांना मुक्त बोलता येत नाही. येथे आत येताना पोलिसांनी सुरक्षिततेच्या नावाखाली काय केले हे आम्ही पाहिले.

हा नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितले की आम्हांला बोलण्याचा अधिकार आहे.

हायड्रो-क्लोरिक एसिड हा अत्यंत जीवघेणे रसायन असुन त्याचा परिणाम शरीरातील आतील भागांवर गंभीर आजार होत असतात. फुफ्फुसाला छिद्रे पडतात. त्याचे प्रमाण विस्तारिकरणामुळे अकरा पटीने वाढणार आहे. मात्र ईआयए अहवालात त्याचा

अभ्यासच करण्यात आलेला नाही. तरीसुध्दा ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून ती बेकायदेशीर आहे, म्हणून ती रद्द करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३८) **श्री भावेश फावडे, भूमीपुत्रः-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना विनंती राहिल की आपण जी बेकायदेशीर जनसुनावणी रेटत आहात. बैठकीत येथे श्री डिमेलो सूचना/आक्षेप उपस्थित करत असताना आपण सांगितले वारंवार एकाच व्यक्तीने बोलू नये, तर दुस-या व्यक्तीस बोलण्याची संधि द्यावी. तर आपणास सांगू इच्छितो की या लढ्यात तीन निष्णात वकील आहेत. त्यांना प्रदूषण कायद्याचे ज्ञान आहे. येथे काही सामाजिक क्षेत्रातील माननीय बोलले. ते सर्वजण गेले कित्येक वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करत असून नेतृत्व म्हणून पुढे आलेले आहेत. ज्यांनी बोईसर विभागात हजारो विद्यार्थी तयार केले, त्या माननीय व्यक्ती आहेत. मात्र पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचा बैठकीतील दृष्टीकोन स्थानिकांना संशयास्पद वाटतो. येथे

आपण येथे जनसुनावणी रेटून न्याल, मात्र आम्ही न्यायालयात याची दाद मागणार आहोत. कारण आमच्याकडे सामाजिक चळवळीत उभे आयुष्य घालविलेल्या आदरणीय व्यक्ती आहेत. तसेच निष्णात वकिलांची साथ आमच्यासोबत आहे.

३९) **श्री चेतन हरिभाऊ चुरी, ग्रुप ग्रामपंचायत मान सदस्य, राहणार- वारांगणे-मान ग्रामस्थ, तालुका, जिल्हा-पालघरः-**

आपणास निवेदन देण्यात येते की मान ग्रामपंचायत क्षेत्र पेसा कायद्यांतर्गत अनुसुचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले असून ग्रामसभेस विशिष्ट अधिकार देण्यात आलेले आहेत. ग्रामसभेच्या अधिकाराचा वापर करुन ग्रामपंचायत मान यांनी दिनांक २४-०३-२०२६ रोजी आयोजित केलेल्या ग्रामसभेत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेल्या प्रस्तावित विराज प्रोफाईल्सच्या विस्तारिकरणास एकमताने विरोध केलेला आहे व तसा ठराव ग्रामसभेत उपस्थित ४३७ ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने मंजूर केलेला आहे. तो मी वाचून दाखवितो. त्यावेळी उपस्थितांनी सर्वांना आवाहन केले की ज्यांचा विरोध आहे, त्यांनी हात वर करावेत. बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांनी हात वर केले.

त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस येथे सर्व ग्रामस्थांचा विरोध आहे याची नोंद घेण्याची विनंती केली.

**श्री. चुरी यांनी सांगितले की मी ठराव वाचून दाखवित आहे. त्यांनी ग्रामपंचायत मान यांनी एकमताने मंजूर केलेला ठराव वाचून दाखविला, त्याची प्रत उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केलेली असल्याचे सांगितले.**

या ठरावाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय-पालघर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेली आहे.

बैठकीच्या इतिवृतात ग्रामपंचायत कार्यालयाने एकमताने मंजुर केलेला ठरावाचा अंतर्भाव करण्यात यावा. या जनसुनावणीचा सर्व ग्रामस्थ निषेध करत आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**४०) श्री रमेश डोंगरे, माजी जिल्हा परिषद सदस्य, मान -**

सर्वप्रथम ही जी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे, त्या बैठकीचा निषेध करतो. कारण बेकायदेशीरपणे येथे जनसुनावणी आयोजित केलेली आहे. सर्व वक्त्यांच्या तोंडातून निषेध व्यक्त करण्यात आलेला आहे. याठिकाणी विराज संदर्भात जनसुनावणी आयोजित केलेली आहे, ती कोणत्या अधिकाराने आयोजित केली हे मला समजतच नाही. याठिकाणी जे प्रदूषण आजच्या तारखेला आहे, पाण्याचे, हवेचे प्रदूषण केलेले आहे. उघड्या डोळ्यांनी प्रदूषण बघितलेले आहे. आता प्रकल्पाच्या लगत राहणा-या लोकांनी कंपनीपासून होणा-या प्रदूषणाचे फोटो व व्हिडिओ दाखविला, याने तुमच्या संवेदना जागृत होणे गरजेचे आहे. यापूर्वी आम्ही आपल्याकडे अनेकवेळा तक्रारी केलेल्या आहेत. कच-याचा मोठा ढीग येथे उभा केलेला आहे. हवेबरोबर परिसरातील लोकांना कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास होतो. आपण ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे, ते रेटून ठेवण्यासाठी केलेली आहे. जनसुनावणीत कुठलीही जबाबदारी आपण घेत नाहीत, फक्त जनसुनावणी ही रेटून नेत आहात. सुप्रीम कोर्टाच्या निकालाचे वाचन करण्यास सांगितले तर आपली मानसिकता दिसली नाही. याबाजूला आम्ही प्रदूषण होणार आहे असे म्हणतो, तर ते होणारच आहे. या कार्यरत विराज प्रकल्पाने येथे पाण्याचे, वायूचे, जमिनीचे, जंगलांचे

प्रदूषण केलेले आहे. येथे वक्त्याने सांगितले की दाट जंगल तोडून आपण जंगल विनाशाकडे नेत आहेत.

तसेच या प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनी या कायदेशीर घेतलेल्या आहेत असे आम्हांला वाटत नाही. या आदिवासीसमाजाच्या जमिनीही अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत. जमिन अधिग्रहित करताना पेसा ग्रामपंचायतीची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक असतानाही ती घेण्यात आलेली नाही. कंपनीच्या प्रशासनाने केली नाही व आपण तपासून बघितलेली नाही. याचा अर्थ आपणास डोळे असून आंधळे, कान असून बहिरे व हातपाय असून पांगळे अशी अवस्था झालेली आहे. येथे उपस्थितांना विचार व्यक्त केलेला आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रथम बरखास्त व्हायला पाहिजे.

राज्यघटनेने आम्हांलाही स्वच्छ हवा, स्वच्छ पाण्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. या प्रकल्पाच्या हवाई अंतर १.५ कि.मी. वर सूर्या नदी आहे. ती आमची संजिवनी आहे. पुढे मीरा-भाईंदरपर्यंत पाणी पुरविणारी नदी आहे. या नदीच्या ७०० मीटर्स अंतरावर टेक्सटाईल पार्क प्रकल्प येणार होता. म.प्र.नि.मंडळाने त्यास Consent to Establish (C to E) प्रदान करण्यात आलेला होता. आम्ही आंदोलन करुन प्रकल्प रद्दबादल केला. गरज पडल्यास रस्त्यावर उतरुन ही लढाई आम्ही तीव्र करु. तसेच प्रशासनाबरोबर आमची कायदेशीर लढाई ही चालूच राहिल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४१) **श्री---, निवृत्त शिक्षकः-** विराज कंपनी हा अजगर आहे. ९ हेक्टरवर होता, तो ४१ हेक्टर जमिन गिळंकृत्त करणारा आहे. येत्या दहा वर्षात मला वाटत नाही की विराज कंपनी जमिन बाकी ठेवेल. आजच रोखणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी बसलेले आहेत. त्यांनी अगोदरच घोषित करायला पाहिजे होते की तुम्ही कितीही आक्रोश करा, आम्ही अहवाल देणार येथे जल, हवा, माती, ध्वनी यांचे प्रदूषण होणारच नाही. एमआयडीसीच्या बाहेरिल क्षेत्र जर आता आहे तसे म्हणजे निसर्गरम्य परिसर कसा टिकून राहिल त्याबाबतच्या उपाययोजना सांगाव्यात. येथे जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी बसलेले आहेत. त्यांनी अहवाला द्यावा की येथे एकही माणूस हा कंपनीच्या बाजूने बोललेला नाही, हा निसर्गरम्य परिसर टिकून राहण्यासाठी उपाययोजना राबविण्याचा व विराज प्रकल्प रद्द करण्याची शिफारस करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४२) **श्री. हेमंत साळुंखे, संभाजी बिग्रेड पालघर, तालुका अध्यक्षः-**

आतापर्यंत सर्व वरिष्ठांनी मुद्दे मांडलेत, म्हणून मला जास्त बोलायची गरजच नाही. कारण विराज ग्रुप काय आहे हे कोणालाही विचारले तरी तो सांगेल.

दुसरी गोष्ट आज जनसुनावणीच्या नांवाखाली नाटक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेले आहे, याचा मी निषेध करतो. आमचा भरोसा आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर नाही. ते काळ्या यादीतच आहे. आम्ही शेवटपर्यंत हा लढा लढणार आहोत.

मी भूमीपुत्र आहे. हा जो गावक-यांचा लढा आहे, आम्ही एकत्र लढणार आहोत. स्टेजच्या मागे बसलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे ग्रामस्थांच्या आक्षेपास हसत होते. ही जनसुनावणी बेकायदेशीर असून ती आम्हांला मान्य नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ त्यांच्या वरिष्ठांना जो अहवाल देतील, तो कायदेशीर देण्यात यावा. कोणाच्याही लालसापोटी करु नका.

दुसरी गोष्ट तारापूरमध्ये जी विनाशकारी कंपनी असेल तर ती विराज प्रोफाईल आहे. एमआयडीसीतील विराजचे सर्व प्रकल्पाची परत पाहणी करा व येथे जनसुनावणीचे जे नाटक चालू आहे, ते बंद करा. भारताच्या राज्यघटनेने दिलेल्या संवैधानिक अधिकारानुसार बोला.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४३)**श्री योगेश पाटील, माजी पंचायत समिती सदस्य, राहणार-गुंदले, तालुका, जिल्हा-पालघरः-**

विशेष म्हणजे जेव्हा सभा चालू झाली, सभा चालू असतानाच उपस्थित वकिलांनी सांगितले की सभा कशी बेकायेदशीर आहे. तरी पण आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दगडासारखे तिथेच बसून राहिले. आम्हांला वाटले आपण बेकायदेशीर सभा आहे हे ऐकून मंच सोडाल. मात्र आपण दगडासारखे बसून राहिलात, म्हणजे तुमचे कुठेतरी पाय चिखलात आहे असा आम्ही संशय व्यक्त करतो. येथील सामान्य जनता एक असून एक एक रुपया काढून संपूर्ण विराज विकत घेईल. आम्ही कितीतरी वेळा आपणास

विराजच्या विरुध्द तक्रारी दिलेल्या आहेत. येथे विराजचा राखेचा डोंगर होता. तो दहा दिवसात आता कुठे गेला. ती राख बारीपाड्यात टाकून आमच्या पाण्याचा स्त्रोत पूर्णपणे बिघडून टाकला. तर त्यावेळस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी का नाही दखल घेतली?

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना विनंती आहे की हे रेकॉर्डिग घेऊन स्वतः ऐका, नंतरच अहवाल तयार करा.

येथे जल, वायू, माती, ध्वनी प्रदूषणावर चर्चा झाली. मात्र माणसापासुन होणा-या प्रदूषणाबाबत चर्चा झालेली नाही. येथे विस्तारिकरणामुळे मानवी प्रदूषणाबाबत कोणीच बोलत नाही. विस्तारिकरणामुळे येथे ४-५ लाख लोक येतील, परप्रांतीय येतील, त्यांच्यामुळे येथे प्रदूषणात वाढ होईल. ते आम्ही स्थानिकांनी सहन करायचे काय? याचा अह्वालात कुठेच उल्लेख नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Consent to Establish (C to E) प्रदान करताना त्यात नमूद करावे लागते संबंधित प्रकल्पास ना हरकतचा ग्रामपंचायचा दाखला आहे किंवा नाही? येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काय पाहिले? म्हणजे ग्रामपंचायतचा दाखला नसतानाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Consent to Establish (C to E) प्रदान केलेली आहे.

आमचे मान गाव पूर्वी स्वर्ग होता. आता त्याचे नरकात रुपांतर झालेले आहे.

ही जनसुनावणी ही पूर्णपणे बेकायदेशीर असून त्याचा आम्ही निषेध करत आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४४) **श्री प्रशांत प्रभाकर पाटील, राहणार-पडघे गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

माझी एक विनंती राहिल येथे १००% विरोध करण्यात आलेला आहे. आमच्या भावना तुमच्या अहवालात आल्या पाहिजे. अन्यथा लोक कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाही, यास सर्वस्वी तुम्ही (जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) जबाबदार असाल. बैठकीत सर्वांनी मते मांडली, त्यावरच आपला अहवाल असला पाहिजे. आम्हांला येथे प्रदूषणामुळे मरायचे आहे, तर त्याशिवाय आंदोलन करुन मरु. आमची स्वर्गासारखी गावे जर

नरकात रुपांतर झाले आहे, तर अहवाल पारदर्शक व लोकांनी व्यक्त केलेल्या भावनेनुसारच आला पाहिजे.

**<u>एडव्होकेट राहूल पाटील यांनी सांगितले की मान गावच्या महिला आहेत,</u>** त्या विराज कंपनीत गेले १५ वर्षे काम करत आहेत, त्यांना बैठकीत काही मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत.

४५) **<u>लाडकू वेडगाः-</u>**

इतके दिवस आम्ही येथे काम करत आहोत. मामाजींनी जागा घेतल्यापासून आम्ही येथे काम करत आहोत. आमच्याकडे कोणी लक्ष देत नाही, आम्हांला कोणीही दाद देत नाही. एवढे वर्षे काम करुनसुध्दा आम्हांला दवाखान्याचा खर्चसुध्दा दिला नाही. मामाजी सकाळी ६-७ वा. कामाला बोलावितात. गाईचा गोबर भरायचा, म्हशीचा गोबर भरायचा, त्याचप्रमाणे जिकडे पाठवले, तर तिकडे पण आम्ही जातो. नंतर ते साईडला ठेवतात. आम्ही येथे एवढे काम करुन म्हातारे झालो, आमच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. घरी राहून आम्ही काय करणार, येथेच म्हातारे झालो आम्ही.

करोना असताना रस्ता बंद असतानाही गावकरी येऊन देत नव्हते, तरीही त्यांची गरज म्हणून आम्ही येऊन गोबर भरुन दिलेले आहे. शनिवार असला तरी आम्ही येऊन गोबर भरुन देतो व घरी जातो. ते आम्हांला गाली/ शिवी देतात, पण आम्ही त्यांचे काम करतो. आम्ही त्यांची गरज सरवली, आमची गरज कोणी सरवत नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४६) **<u>स्थानिक महिला :-</u>**

मामाजी पहिला सायकल घेऊन यायचा आम्हाला बोलवायला. तो काहीच बोलत नाही. एवढ वर्षे काम करुन मामाजीनी आम्हांला काहीही दिले नाही. आता बोला काय बोलायचे ते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४७) **<u>वनिता मोरः-</u>** आम्ही तेवीस वर्षे झाली काम करत आहे. आमचे हातपाय दुखतात, तरीही आम्ही काम करतो. आम्हांला मामाजीने लक्ष दिले नाही. आम्हा अजूनही गाईचा गोबर भरतो. चाळीस रुपयात काम करत आहोत. आमच्याकडे कोण बघत नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४८) **<u>एडव्होकेट राहूल पाटील यांनी सांगितले</u>** की येथील महिलांनी त्यांची व्यथा मांडली. आता लोकांना कळले असेल त्यांचे किती सक्षमीकरण झाले. आता माईक मी पुढील वक्त्यास देत आहे.

**<u>४९) ब्रॅन्डन सायमंड अल्मेडा, राहणार-श्रीनिवास पार्क, मान, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>**

मी मूळचा मानचा, जन्म माझा मानचा. आज मी येथे व्यक्ती म्हणून नाही, तर आपल्या गावाचा रहिवाशींचा आवाज म्हणून उभा आहे. विराज इंडस्ट्री विस्तार हा केवळ प्रकल्प नाही, तर आपल्या जीवावर, आपल्या पाण्यावर, आमल्या जमीनीवर आणि आपल्या --- थेट आघात आहे. विराज प्रोफाईल्सच्या विनाशकारी विस्तारीकरणास विरोध असल्याबाबत वरिल विषयावर आयोजित जनसुनावणीत पुढील निवेदन सादर करत असून विराज कंपनीच्या मान वारांगडे येथे प्रस्तावित असलेल्या विस्तारीकरणास पुढील मुद्द्यांच्या आधारे विरोध नोंदवित आहे.

सदर उद्योगाने स्थानिक रोजगाराबाबत दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. याबाबत कामगार विभागाकडून स्थानिक लोकांना किती रोजगार दिल्याबाबतचे कोणतेही पुरावे दिलेले नाहीत.

गावातील ५२,९९९ कुटुंबातील २,२४,९९९ लोकांच्या वर सकारात्मक परिणाम होईल असा कंपनीचा दावा पोकळ व खोटा आहे.

आजपर्यंत या उद्योग समुहामुळे कोणताही सकारात्मक परिणाम झाल्याचा पुरावा उपलब्ध नाही.

कच्चा माल, तयार माल, स्क्रॅपची ने-आण करण्यासाठी किती वाहने रोज ये-जा होईल याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही,

कंपनी स्वतःची वाहने वापरत असल्यास त्याची संख्या, वाहनतळाची व्यवस्था याबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही.

सदर उद्योग समुह कंपनीजवळ अतिशय धोकादायक आहे. जोडणारा एकमेव रस्ता बोईसर ते चिल्लार फाटा मुंबई-अहमदाबाद महामार्ग असून कंपनीजवळ असणे अतिशय धोकादायक आहे. याबाबत काय उपाययोजना करणार, याबाबत योग्य तो अहवाल प्राप्त केल्याचे दिसून येत नाही.

परिसरातील एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो व तो कमी दाबाने केला जातो. एमआयडीसीकडे पुरेसे पाणी असल्याबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही.

पिण्याच्या पाण्याबाबत ठोस आरक्षण योजना कार्यान्वित केल्याशिवाय उद्योगाला पाणीपुरवठा करण्याबाबतीच योग्य माहिती दिलेली नाही.

तरी हे सर्व मुद्दे लक्षात घेता विराज प्रस्तावित विस्तारिकरणास आमचा विरोध असुन प्रकल्प रद्द् करावा ही मागणी करीत आहे. कारण आपण आधिच अनुभव घेतलेला आहे की उद्योगातून सोडलेले रसायनयुक्त पाणी नाल्यामध्ये मिसळले जाते.

पाण्याचा टीडीएस वाढला आहे. आणि बोअरवेल पाणी खराब झालेले आहे. मासे, बेडुक यासारखे जलचर नाहिशे होत आहेत. पाणी म्हणजे जीवन आणि जीवन आज धोक्यात आहे.

उद्योगातून निघणारा धूर, धूलीकण आणि विषारी वायू श्वास घेण्यास त्रास होतो, दमा, त्वचारोग, मुलांमध्ये व वृध्दांमध्ये गंभीर आजार

आपण स्वच्छ हवा, श्वास घेण्यास गमावणार आहोत का?

रासायनिक कच-यामुळे शेती नापीक होते, पिकांची गुणवत्ता घसरते, अन्न साखळीमध्ये विष प्रवेश करते. शेती खराब झाली तर उद्या अन्न कुठुन आणणार?

गावात आधीच दिसत आहेत श्वसनाचे, पोटाचे आजार. हा हळूहळ होणारी विषबाधा आहे.

आपला भाग आदिवासी पेसा क्षेत्रात येतो. ग्रामसभेची परवानगी आवश्यक आहे. संमती न घेता प्रकल्प पुढे चालविणे हे बेकायदेशीर आहे. ग्रामसभा सर्वोच्च आहे आणि तिचा अपमान् मी सहन करणार नाही.

आम्ही स्पष्ट सांगू इच्छितो की विराज विस्तारिकरण प्रकल्प तात्काळ थांबवावा.

स्वतंत्र पर्यावरण व तपासणी करावी. पाण्याचे, हवेचे, जमिनीचे परिक्षण करावे. ग्रामसभेची लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही काम सुरु करु नये.

विकास हवा आहे, पण तो आपल्या जीवाच्या किंमतीवर नको. आम्हांला रोजगार हवा आहे, पण रोग नकोत. प्रगती हवी आहे, पण प्रदूषण नको. आज आपण आवाज उठवला नाही, तर उद्या आपल्या पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत.

जल, जमीन आणी जंगल हे आमचे हक्क आहेत. आणि त्यांचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. विकास नाही, हा विनाश आहे. आमच्या पाण्याशी खेळू नका. जीवाशी खेळू नका. केवळ विकासाचा प्रश्न नाही, तर जीवाचा प्रश्न आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

५०) **श्री संदीप विष्णू भावर, मान ग्रामपंचायतेतील वारांगडे गावचा पेसा अध्यक्षः-**

प्रथम मी प्रशासनास व विराज व्यवस्थापनास विचारू इच्छितो की त्यांनी आमच्या पेसा गावची ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) घेतली होती का? कृपया होय किंवा नाहीमध्ये त्यांनी उत्तर द्यावे. जर उत्तर नाही तर पेसा कायद्याची पायमल्ली केली का नाही केली? पेसा कायदा हा ५ व्या अनुसूचीचे संक्षिप्त रुप आहे. हा आम्हांला संविधानाने प्रदान केलेला अधिकार आहे. संविधान हेच सर्वोच्च् आहे. संविधानाने सांगितलेले न्यायालयातील सर्वोच्च सुप्रीम कोर्टचा निकाल वाचत नाहीत. पेसा कायद्याची पायमल्ली केली याबाबत काहीही बोलत नाहीत. जनसुनावणीचा अर्थ काय होतो?

सादरीकरणात दर्शविले की विराज कडून काहीही प्रदूषण होत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना मी विचारतो की माण ग्रामपंचायतचे १३-६-२०२५ चे पत्र, मप्रनि मंडळाची पोच दिलेली आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढे काय कार्यवाही केली? नाल्यामध्ये पाणी सोडले जाते. बाजूला बोअरिंग मारले, तर लाल पाणी निघते. हे पाणी आपण पिऊ शकता का? शासन आणि प्रशासन यांनी पंधरा दिवस हे पाणी पिऊन दाखवावे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे असेच चाललेले असते. यावेळेस ग्रामपंचायतीच्या नोटिसवर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची वेळच दिलेली नाही.

पूर्वी एनक्रॉप प्रकल्पाबाबत आमचा लढा चाललेला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अहवाल दिलेला होता की संबंधित प्रकल्पापासून सूर्या नदी ही २५.० कि.मी. लांब आहे. तर त्या प्रकल्पापासून सूर्या नदी २.५ कि.मी. आहे. ग्रामस्थांनी तक्रार केली असता पॉईंट टाकण्यात चूक झाली असे सांगितले. आमच्या गावापासून फक्त २०० मीटरवर कंपनी आहे, त्याचे दुःपरिणाम आम्ही भोगत आहोत.

त्यांनी सांगितले की मी एक शेतकरी आहे. तसेच सखाराम तोडे नावाचे एक शेतकरी आहेत. तेथील कंपनीच्या दुषित पाण्यामुळे त्याने शेवटी तलाव खोदला. तर तलावातही लाल पाणी निघाले. आमचा काडीमात्र विश्वास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर नाही. आदिवासी समाजाचे हक्क हिरावून घेत आहे.

जर आता विराजमुळे आमच्या जमिनी खराब झाल्या, तर सर्वजण रस्त्यावर येऊन आंदोलन करण्यात येईल. आमचा लढा हा पुढच्या पिढीसाठी आहे.

तरी स्थानिक लोकभावनेचा आदर करुन ही बेकायदेशीर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. हा प्रकल्पच आम्हांला नको आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

५१) **मी गुंदले बारापाडाचा रहिवाशी आहे**. आमच्या गावाला विराजने जरी पाणीपुरवठा केला, पण ते जे जलप्रदूषण करत आहेत, त्याचे व्यवस्थापन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यक्षमतेने काम करत नाही, म्हणूनच विराजसारखे लोक प्रदूषण करतात. मी शासकीय प्रशासनास दोष देईन ते या कृत्याकडे डोळेझाक करत आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

५२) **श्री भावेश चुरी, वारांगडे ग्रामस्थ, तालुका, जिल्हा-पालघरः-**

मुळात ही पर्यावरणविषयक जनसुनावणीच संशयाच्या भोव-यात अडकलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केली.

त्याची जाहिर सूचना ही ४ मार्च, २०२६ रोजी वृत्तपत्रात प्रकाशित झाली. तर त्याची सूचना (नोटीस) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झाली १३ मार्च, २०२६. त्यामुळे स्थानिक लोक, ग्रामस्थ, प्रकल्पबाधित गावातील लोकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना/आक्षेप नोंदविण्यास कमी वेळ मिळाला. तसेच जनतेच्या माहितीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे बॅनर्स हे काल संध्याकाळी लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे सर्व ग्रामस्थांना असे वाटत आहे की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही लपून करावयाची आहे. म्हणजे विराज कंपनीचे प्रस्तावित विस्तारिकरण हे येथील सामान्य जनतेपासून लपवायचे होते.

या बैठकीत सर्व उपस्थितांनी एकमताने या विराज कंपनीच्या प्रस्तावित विस्तारिकरणास विरोध केलेला आहे. आणि २४ मार्च, २०२६ रोजी मंजूर झालेला पेसा ग्रामसभेचा ठराव हा साधा ठराव नसून तो पेसा कायद्यांतर्गत एकमताने पारित केलेला आहे. सर्वप्रथम पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी रद्द होण्याचा ठराव घेतला, नंतर विराज प्रोफाईल्सच्या विस्तारिकरण रद्द करण्याचा एकमताने ठराव मंजूर झालेला आहे.

जर शासकीय प्रशासनास असे वाटत असेल की जनसुनावणी ही रेटून नेली, तर हा गैरसमज आहे. कारण त्याविरुध्द आम्ही मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. तर त्याचा निकाल लागला, तर आपणास कायद्यानुसार परत ही जनसुनावणी आयोजित करावी लागेल. कारण पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेच्या पूर्वपरवानगीशिवाय ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करुच शकत नाही. बैठकीत आमचे सहकारी एडव्होकेट राहूल पाटील यांनी सांगितलेच आहे की सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार याप्रकारे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजितच करता येत नाही. तर आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या विरोधात Contempt of Court दाखल करणार आहोत. तसेच आपण आपल्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच अवमान केलेला असल्याने आपणास सर्वोच्च न्यायालयातही खेचणार आहोत. शासकीय अधिकारी व कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत.

पालघर जिल्ह्यात किती प्रकल्प लादलेले आहेत. येथे सर्व मान्यवरांनी आपले विचार मांडले असून सर्व उपस्थितांना विराजच्या प्रस्तावित प्रकल्पास विरोध केलेला आहे. जरी जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने योग्यप्रकारे अहवाल शासनास सादर केला नाही, तरीही आमच्याकडे शाश्वत रेकॉर्ड आहे.

विराज कंपनीच्या हाकेच्या अंतरावर बेटेगाव ग्रामपंचायत आहे. तेथे विराज कंपनीने केमिकल पावडरचा डोंगर केलेला आहे. सर्वसामान्य माणसांनी आवाज उठवला व त्यास आपण मुकसंमती दिलेली आहे. आम्ही वारंवार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास लेखी तक्रारी केलेल्या आहेत. आमचे नशीब चांगले की बुलेट ट्रेन आली व अर्धा डोंगर हा खाली झाला. त्या डोंगरात लाईमस्टोन नावाचे घातक रसायन आहे. तो डोंगर आमच्या भोळ्याभाबड्या जनतेस फसवुन उभारलेला आहे. मी जिल्हा प्रशासनाचा निषेध करतो की त्यांनी घराघरात पाणीच दिलेले नाही. आतापर्यत आम्ही विहिरी व बोअरचेच पाणी पित आहोत. नदी, ओढ्याचे पाणी पित आहोत.

२०१२ ला या विराज कंपनीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली होती. त्यावेळी विराज व्यवस्थापनाने अनेक आश्वासने दिलेली होती. ते कुठलेच आश्वासन पाळण्यात आलेली नाही याची नोंद घेण्यात यावी. या कंपनीने २०१२ पासून प्रदूषणाशिवाय आम्हांला काहीही दिलेले नाही. ना शाश्वत रोजगार, ना सामाजिक विकासाची कामे केली. येथे भगिनींनी सांगितले आहेच की विराजच्या गाड्यांनी किती लोकांचे प्राण गेले, कित्येक लोक अपंग झाले. त्यांचे जे बलिदान झाले, त्याचे खापर हे विराज कंपनी व जिल्हा प्रशासनावर आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा नाकर्तेपणा आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे कंपनीच्या, धनदांडग्यांच्या बाजूचे आहे. हा आमचा कडवट अनुभव आहे.

तरी आमची मागणी आहे की ही बेकायदेशीर जनसुनावणी ही रद्द झालीच पाहिजे. आमचा प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास पूर्ण विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

५३) **श्री प्रशांत प्रभाकर पाटील, राहणार-पडघे गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

काही विषय उपस्थित करावे लागत आहे. ज्यावेळी MoU झाला, त्यावेळी सांगण्यात आले की या भागातील लोक विस्थापित होतात, आणि स्थानिकांना विस्तापित न होण्यासाठीच हा प्रकल्प कामाला येईल. आता येथे स्थानिक महिला/भगिनी बोलल्या, त्यांच्या जमिनीवर हा प्रकल्प उभारला व उभारण्यात येणार आहे, तर वीस वर्षे काम करुन त्यांची हलाकीची स्थिती आपण पाहिली, तर पुढे काय होईल?

५४) **<u>श्री सुभाष चुमडा, राहणार-मान, तालुका, जिल्हा-पालघरः-</u>** माझ्या हातून माईक खेचला, विराजला हे लोक विरोध करतात. तर विराजला जागा स्थानिकांनी का दिल्या. बरेच शेतकरी आहेत, त्यांना समजत नाही, त्यांनी जागा दिल्या. जर विराजला विरोध आहे, तर आजूबाजूची जमीन का देता.

विराजने २०१२ साली स्थानिकांना रोजगार देऊ सांगितले, ते वचन पाळले नाही. आपण पेसा ग्रामपंचायती क्षेत्रात जाऊन स्थानिकांना विचारा, येथील नेते व त्यांचे कार्यकर्ते हेच विराजला जमीन देत आहेत. तर विराजने फक्त प्रदूषण दिले, रोजगार दिला नाही व स्थानिक लोक फक्त भरवशावर राहत आहेत. लोक विरोध करतात, मग कंपनी कशी चालू होते.

आदिवासी समाजाला विश्वासात न घेता नेते लोक गावात जातात, आपसात बैठक घेतात. मला कंपनीचे देणेघेणे नाही, मी समाजसेवक आहे. लोकांची कामे करतो, विराजला जमिनी देऊ नका. मी कंपनीच्या विरोधातच आहे. ही कंपनी चालूच होऊ नये. आपण विरोध करतो, तरीही कंपनी चालू होते, त्याची जबाबदारी कोण घेणार?

येथे स्थानिक आपसात चर्चा करत होते. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आपसात न बोलता फक्त पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

यावेळी एका उपस्थितांनी समजून सांगितले श्री सुभाषभाऊचे असे म्हणणे आहे की आधि विरोध करतात, नंतर संमती देतात, तर असे करु नये, कायमच विरोध करावा.

एडव्होकेट राहूल पाटील यांनी स्पष्टीकरण दिले की सुभाषभाऊ नव्हते, विशेष ग्रामसभेने चर्चा करुन एकमताने प्रकल्प विस्तारिकरणास व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस विरोध दर्शविलेला आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री प्रशांत प्रभाकर पाटील, राहणार-पडघे गाव, तालुका, जिल्हा-पालघर यांनी सांगितले की आम्ही सर्व स्थानिकांनी एकत्रितपणे या प्रकल्पास विरोध केलेला आहे. आम्ही सर्व स्थानिक एकत्र उभे राहतो व हात वर करुन पूर्णपणे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास आमचा विरोध आहे हे दर्शवितो. सर्वांना उभे राहून हात वर करण्याची विनंती केली.

सर्व उपस्थितांनी उभे राहून हात वर करुन विस्तारिकरण प्रकल्पास विरोध दर्शविला.

श्री. प्रशांत प्रभाकर पाटील यांनी सर्व बाजूने व्हिडिओ घेण्याची सूचना केली. येथील सर्व गावे, सर्व तालुका, सर्व जिल्हा या विराज प्रकल्पाच्या विस्तारिकरण प्रकल्पाच्या विरोधात आहे यावरुन दिसत आहे.

सर्व उपस्थितांनी भारतीय संविधानाचा विजयाच्या घोषणा दिल्या.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व सुधारित २००९ नुसार मे. विराज प्रोफाईल प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली होती. या जनसुनावणीत आपण आपल्या सूचना, विचार, भावना, हरकती व आक्षेप उपस्थित केलेले आहेत. या सर्वांची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच ज्या नागिरकांनी त्यांच्या लेखी सूचना/हरकती बाहेरल पेटीत टाकलेल्या आहेत तसेच काहींनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आजपर्यत वेगवेगळ्या कार्यालयात वेगवेगळी निवेदने ईमेल/वैयक्तिक सादर केलेली आहेत, ती एकत्रित करुन बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल. आपण शांततेत्या मार्गाने या बैठकीत सहभाग नोंदविला, निःपक्षपणे आपली मते मांडलेली आहेत, त्या सर्वाचा आदर करतो आणि ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर करतो.

त्यानंतर एडव्होकेट राहूल पाटील यांनी सूचना केली की आतापर्यंत प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्राप्त झालेल्या हरकती किंवा समर्थनार्थ पत्रे किती आली हे जाहिर करण्यात यावेत. अन्यथा विराज कंपनी नंतर अनेकांकडून लेखी समर्थनार्थ पत्रे घेतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप याची नोंद घेण्यात आलेली आहे. येथे सकारात्मक किंवा नकारात्मक असे काहीही नसते. तसेच ज्या लेखी सूचना प्राप्त झाल्या त्या शासनास सादर करण्यात येणार आहेत.

त्यावेळी एडव्होकेट राहूल पाटील यांनी विचारणा केली की समर्थनार्थ किती आली, तसेच किती कालावधीपर्यच लेखी सूचना/आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ड्रॉप बॉक्स मध्ये ६०० (अंदाजे) निवेदने प्राप्त झालेली असून बैठकीपूर्वी ३५७ लेखी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. तसेच बैठकीचे इतिवृत्त हे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १,३०१ सूचना/ आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(विरेन्द्र सिंह)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
तारापूर-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बोईसर,
तालुका, जिल्हा-पालघर

**(किरण हसबनीस)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे

**(सुभाष भागडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,पालघर,
जिल्हा - पालघर